# दैनिक राष्ट्र सह्याद्री

मंगळवार दि.०१ सप्टेंबर २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८


## शनिशिंगणापूर येथे दर्शन रांगेत सोन्याचे मिनीगंठण चोरी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शनिशिंगणापूर** : शनीदर्शनासाठी कुटुंबासह आलेल्या महिलेच्या गळ्यातील सुमारे २.५ तोळे वजनाचे, अंदाजे ६२ हजार ५०० रुपये किमतीचे सोन्याचे मिनीगंठण अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेत चोरून नेल्याची घटना शनिशिंगणापूर येथे घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी गिरीश ज्योतीराम काकडे (वय ३८, रा. विलासपूर, ता. जि. सातारा) हे २९ ऑगस्ट रोजी कुटुंबासह शनिशिंगणापूर येथे शनीदर्शनासाठी आले होते. सकाळी सुमारे ७.०५ वाजता दर्शनाच्या रांगेत असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या आईच्या गळ्यातील सोन्याचे मिनीगंठण चोरून नेले. याप्रकरणी शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १५१/२०२६, भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अज्ञात चोरट्याविरुद्ध पोलिसांनी तपास सुरू केला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास वरिष्ठांच्या आदेशानुसार ग्रेड पोलीस उपनिरीक्षक कारखेले करीत आहेत. प्रभारी अधिकारी म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक धनवटे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

## समृद्धी महामार्गावर लक्झरी बस कंटेनरवर आदळली

### एकाचा जागीच मृत्यू, १० जखमी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : रोजच्या नोकरीसाठी वैजापूरहून वालुंजकडे जाणाऱ्या ५३ वर्षीय कामगाराचा समृद्धी महामार्गावरील भीषण अपघातात जागीच मृत्यू झाला. हडसपिंपळगाव शिवारात सोमवारी पहाटे सहा वाजेच्या सुमारास लक्झरी बस कंटेनरवर मागून जोरात आदळल्याने हा अपघात झाला. हेमंत हरिश्चंद्र दाभाडे (वय ५३, रा. परदेशी गल्ली, वैजापूर) असे मृत कामगाराचे नाव असून, दुर्घटनेत दहा जण जखमी झाले आहेत.

दाभाडे हे मागील सुमारे ३० वर्षांपासून वालुंज येथील बजाज कंपनीत कार्यरत होते. दररोज वैजापूर-वालुंज असा प्रवास करणारे दाभाडे सोमवारी नेहमीप्रमाणे लक्झरी बसने निघाले होते. मात्र, हडसपिंपळगाव शिवारात बसने कंटेनरला मागून जोरदार धडक दिली.

धडक इतकी भीषण होती की बसच्या पुढील भागाचा चक्काचूर झाला. मिळालेल्या माहितीनुसार, कंटेनर क्रमांक यूके ०८ सीबी ७६६० महामार्गावरून जात असताना अहमदाबादहून लातूरकडे जाणारी लक्झरी बस (क्र. एआर २० ए ९२९२) कंटेनरवर आदळली. अपघाताची माहिती मिळताच महामार्ग यंत्रणा व पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

जखमींना तातडीने वैजापूर उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या अपघातामुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला. दाभाडे यांच्या पश्चात पत्नी, मुलगा व मुलगी असा परिवार आहे. अपघाताचे



नेमके कारण शोधण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू असून घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला आहे.

## मुठेवाडगाव सोसायटीची सभा कोरमअभावी तहकूब

### ९ सदस्यांचा बहिष्कार | सत्ताधारी गट अल्पमतात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगांव** : श्रीरामपूर तालुक्यातील मुठेवाडगाव विविध कार्यकारी सोसायटीच्या सभेवर ९ सदस्यांनी बहिष्कार टाकल्याने कोरम अभावी चेअरमन व अन्य तीन सदस्यांना सभा तहकूब करावी लागली असून संस्थेच्या इतिहासात पहिल्यांदाच सभा तहकूब करावी लागल्याने, आगामी ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोसायटीत एकमेकांना कोंडीत पकडण्याचे पडसाद ऊमटू लागल्याची चर्चा मुठेवाडगावात सुरू झाल्याचे दिसून आले.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की आज सोमवार दि.३१ रोजी मुठेवाडगांव सेवा सहकारी सोसायटीची सभा आयोजित करण्यात आली होती.सर्व १३ सदस्यांना सभेस उपस्थित राहणयाचा अजेंटा पाठविण्यात आला होता. सभेचे वेळेत चेअरमन सौ.द्वारका मुठे सदस्य डॉ शंकरररांव मुठे भागवत मुठे, संभाजी गोसावी हे चार सदस्य उपस्थित होते. अन्य ९ सदस्यांची एक तास प्रतिक्षा पाहिल्यावर सचिव दत्तात्रय जासुद यांनी भ्रमणध्वनीवरून सदस्यांशी सभेस येण्याची विनंती केली.तरीही या सभेस सरपंच सागर मुठे, बबनराव मुठे,शिवाजीराव मुठे, गटाचे विद्यमान व्हा. चेअरमन बबनराव मुठे, सदस्य - भास्करराव मुठे, सुभाषराव मुठे,आण्णासाहेब मुठे, शिवाजीराव मुठे,रमेशभाऊ मुठे, सौ.शकुंतला मुठे तुकाराम रूपटक्के सेवानिवृत्त प्रा.रंगनाथ कोळसे, हे सदस्य अनुपस्थित राहिले. अखेर संस्थेचे सचिव दत्तात्रय जासुद यांनी कोरम अभावी सभा तहकूब केली.

याबाबत अनुपस्थित सदस्यांनी बहिष्कार टाकल्याचे कारण देताना सांगितले की संस्थेत चेअरमनपद एक एक वर्ष रोटेशन पध्दतीने ठरविण्यात आले आहे.परंतू विद्यमान चेअरमन त्यांच्या गटाचे प्रमुख सुत्रधाराचे ऐकून राजीनामा देत नाही.त्यामुळे आम्हा परंतु ९ सदस्यांत तीव्र नाराजी असल्याचे सांगितले.

### सोसायटीत सत्ताधारी डॉ शंकरररांव मुठे (विखे गट) यांच्या बाजूने ४ सदस्य तर विरोधात ९ सदस्य

ग्रामपंचायत व सोसायटीत विखे - मुरकुटे गटाने युती करून निवडणूका लढविल्या. सोसायटीत डॉ शंकरररांव मुठे व मुरकुटे गटाचे शिवाजीराव मुठे यांच्याकडे सत्तेची सूत्रे होती. परंतू आगामी ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर डॉ शंकरररांव मुठे यांची साथ सोडून शिवाजीराव मुठे यांनी सरपंच सागर मुठे व बबनराव मुठे गटाबरोबर युती केली. त्यामुळे सोसायटीच्या सभेवर बहिष्कार ही ग्रामपंचायत निवडणुकीची रंगीत तालीम असल्याचे विरोधकांनी डॉ शंकरररांव मुठे गटास दाखवून दिले असल्याची चर्चा गावात सुरू आहे.

## राहुरीत एलसीबीचा छापा

### गुटखा, पानमसाला व सुगंधी तंबाखू जप्त



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने राहुरी तालुक्यातील राहुरी खुर्द व म्हैसगाव येथे छापे टाकून गुटखा, पानमसाला व सुगंधी तंबाखू असा एकूण १ लाख ७४ हजार ४४ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत दोघांविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या आदेशानुसार पथक ३० ऑगस्ट रोजी राहुरी पोलीस ठाणे हद्दीत गस्त घालत होते. यावेळी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे राहुरी खुर्द येथील पवन ऊर्फ पृथ्वीराज दगडूसिंग गिरासे याच्या राहत्या घरावर छापा टाकण्यात आला.

त्याच्याकडून गुटखा, पानमसाला व सुगंधी तंबाखूचा १ लाख ४७ हजार ५५२ रुपयांचा साठा जप्त करण्यात आला.

यानंतर म्हैसगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील मातोश्री सुपर मार्केटवर छापा टाकण्यात आला. तेथून बाबासाहेब भाऊराव गागरे याच्या ताब्यातील हिरा, विमल पानमसाला व विविध प्रकारची सुगंधी तंबाखू असा २६ हजार ४९२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. हा माल पवन गिरासे याच्याकडून खरेदी केल्याचे तपासात समोर आले.

पोलीस कॉन्स्टेबल अजिनाथ पाखरे यांच्या फिर्यादीवरून दोघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १२३, २२३, २७४ व २७५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहेत.

## दाढ खुर्द, कोल्हेवाडीत अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील अवैध गौण खनिज वाळूची वाहतूक व साठवणुकीविरोधात महसूल विभागाने कारवाईचा बडगा उगारला आहे.

तहसीलदार धीरज मांजरे यांच्या नेतृत्वाखाली दाढ खुर्द व कोल्हेवाडी येथे करण्यात आलेल्या दोन स्वतंत्र कारवायांत अवैध वाळूसाठा व वाहनावर कारवाई करण्यात आली.

कोल्हेवाडी शिवारात २७ ऑगस्ट रोजी पहाटे तहसीलदार धीरज मांजरे, मंडळ अधिकारी विश्वजीत चांगले व ग्राम महसूल अधिकारी राज खेमनर यांच्या पथकाने गस्त घातली. यावेळी रस्त्यावर ओल्या वाळूच्या वाहतुकीच्या खुणा आढळल्या.

त्यांचा माग काढला असता गट क्रमांक ४७८/२ मधील पोटहिश्शात ३० ब्रास वाळूचा अवैध साठा आढळून आला. पंचनाम्यानुसार या वाळूची किंमत ९ लाख ८० हजार रुपये आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे नितीन साखराम दिवे (रा. जोर्वे) यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली.

दरम्यान, दाढ खुर्द येथे २३ ऑगस्ट रोजी रात्री महसूल पथकाने टिप्पर थांबविण्याचा प्रयत्न केला. मात्र, पथकाला पाहताच चालकाने टिप्पर रिव्हर्स घेत भरधाव वेगाने पलायन केले. टिप्परमध्ये अंदाजे दोन ब्रास वाळू आढळली.

याप्रकरणी चालक व वाहनमालक सागर गोरख जगताप यांच्याविरुद्ध आश्वी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महसूल विभागाच्या या कारवाईमुळे अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

## नागेबाबा मंदिर विकासासाठी २.५२ कोटी निधी मंजूर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : ना. राधाकृष्ण विखे यांच्या सहकार्याने व आ. विठ्ठलराव लंघे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून नेवासा तालुक्यातील भेंडा बुद्रुक येथील श्री संत नागेबाबा मंदिर परिसर विकासासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब वर्ग) अंतर्गत करण्यात येणाऱ्या विकास कामांना २ कोटी ५२ लाख ५९ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.



याबाबत महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने प्रशासकीय मान्यतेचा शासन निर्णय जारी केला असून त्यात म्हंटले आहे की पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब वर्ग) अंतर्गत नेवासा तालुक्यातील भेंडा येथील श्री क्षेत्र नागेबाबा गोसावीचे देऊळ ला ब वर्ग ग्रामीण यात्रा स्थळाच्या ठिकाणी विविध विकास कामांकरीता निधी उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला होता.

या प्रस्तावावर ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्य निकष समितीच्या दि. ३१ ऑक्टोबर, २०२५ रोजी झालेल्या बैठकीत विचार करण्यात आला. सदर बैठकीत उपरोक्त नमूद यात्रास्थळाच्या ठिकाणी करावयाच्या विकास कामांची अंदाजपत्रके व इतर कागदपत्रांची तपासणी करुन समितीने विकास कामांकरिता निधीची शिफारस केली आहे. त्यानुसार सदर यात्रास्थळाच्या ठिकाणी करावयाच्या विकास कामांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब वर्ग) ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या योजनेंतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीत निधीतून श्री क्षेत्र नागेबाबा गोसावीचे देऊळ, भेंडा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर या ब वर्ग यात्रास्थळाच्या ठिकाणी एकूण रु. २ कोटी ५२लाख ५९ हजार रुपये निधीला प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

सातत्याने पाठपुरावा करून श्रीसंत नागेबाबा विकासासाठी निधी मिळवून दिल्याबद्दल नागेबाबा मंदिर व्यवस्थापन समिती,ग्रामस्थ व भाविकांनी आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांना धन्यवाद देत त्यांचे अभिनंदन केलेआहे

## घरासमोरून स्कॉर्पिओ चोरी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी फॅक्टरी येथील प्रसादनगर परिसरातून घरासमोर उभी केलेली तब्बल ८ लाख रुपये किंमतीची महिंद्रा कंपनीची स्कॉर्पिओ एस-११ गाडी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

याप्रकरणी वसीम ईब्राहिम पठाण, राहणार प्रसादनगर, राहुरी फॅक्टरी यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीची स्कॉर्पिओ एस-११, क्रमांक एमएच १२ टीवाय १७४४ ही गाडी पठाण यांच्या मालकीची असून ती घरगुती वापरासाठी वापरली जात होती.

३० ऑगस्ट रोजी रात्री गाडी घरासमोर लॉक करून उभी करण्यात आली होती. मात्र, ३१ ऑगस्ट रोजी पहाटे सुमारे ५ वाजता पत्नी पाणी भरण्यासाठी उठल्यानंतर घरासमोर गाडी नसल्याचे निदर्शनास आले. कुटुंबीयांनी परिसरात गाडीचा शोध घेतला असता ती मिळून आली नाही.

त्यानंतर अज्ञात चोरट्याने गाडी चोरून नेल्याची खात्री झाल्याने राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद देण्यात आली. चोरीस गेलेल्या स्कॉर्पिओची अंदाजे किंमत ८ लाख रुपये असून, पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## 'जखमांतून जन्मलेले सामर्थ्य' पुस्तकाचे भास्करगिरी बाबांच्या हस्ते प्रकाशन



छाया-सुधीर चव्हाण नेवासा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : येथील जेष्ठ पत्रकार विजय हरिचंद गांधी यांच्या जीवन चरित्राचा आढावा घेणाऱ्या जखमांतून जन्मलेले सामर्थ्य या पत्रकार बाळासाहेब तनपुरे लिखित पुस्तकाचे प्रकाशन श्री क्षेत्र देवगड गुरूदेव दत्त पिठाचे प्रमुख महंत राष्ट्रसंत भास्करगिरी बाबा यांच्या हस्ते देवगड येथील कल्याण सभागृहात झालेल्या कार्यक्रमात करण्यात आले. दिन दुबळयांची सेवा करत राष्ट्र उन्नतीकरीता जात धर्म न पाहता काम करा असे आवाहन गुरुवर्य भास्करगिरी बाबांनी केले.

यावेळी अध्यक्षस्थानी संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग हे होते तर नेवासा तालुक्याचे आमदार विठ्ठलराव लंघे, माजी आ. बाळासाहेब मुरकटे,जेष्ठ नेते काशिनाथ नवले,जेष्ठ पत्रकार सुभाष गुंदेचा, नेवासा बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील, सत्कार मूर्ती जेष्ठ पत्रकार विजय गांधी, कांचनमाला गांधी, रामभाऊ जगताप, श्रीरामपूर येथील जेष्ठ विधी तज्ज्ञ ड. शशिकांत गांधी, नामदेव महाराज कंधारकर, सूर्यकांत गांधी, राजेंद्र मुथ्था, अभिजित गांधी व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रम प्रसंगी सभापती नंदकुमार पाटील यांनी आलेल्या मान्यवरांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. पुस्तकाचे लेखक जेष्ठ पत्रकार बाळासाहेब तनपूरे यांनी विजय गांधी यांच्या जीवनकार्याचा आढावा सादर केला. मान्यवरांच्या उपस्थितीत व गुरुवर्य भास्करगिरी बाबांच्या हस्ते जखमांतून जन्मलेले सामर्थ्य या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.यावेळी जेष्ठ पत्रकार विजय गांधी व कांचनमाला गांधी यांचा गुरुवर्य भास्करगिरी बाबांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी बोलताना गुरुवर्य भास्करगिरी महाराज म्हणाले, जेष्ठ पत्रकार विजय गांधी यांनी आपल्या जीवनाची वाटचाल संतांच्या संगतीत राहून केली. ७९ वर्षाच्या प्रवासात संत विचारांच्या प्रभावामुळे त्यांनी अनेक संकटे जीवनात पार केली.जीवन हे सुखदुःख मिश्रित असते, दुःखात साथ देणाऱ्याना तर शेवटच्या श्वासापर्यंत आपण विसरू शकत नाही त्याच प्रमाणे गांधी यांना जिवलग मित्रांची साथ मिळाली असल्याचे सांगत त्यांनी विजय गांधी यांच्या दीर्घायुषी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी आ. लंघे व माजी आ. अभंग यांचे जीवनकार्याचा मागोवा घेत शुभेच्छा दिल्या.

यावेळी झालेल्या पुस्तक प्रकाशन सोहळयाच्या प्रसंगी जेष्ठ व्यापारी अशोकलाल बोरा,माजी सभापती शंकर लोखंडे, दिलीपराव पवार, नगरसेवक निरंजन डहाळे, बाबुराव उपाध्ये, भागवत मुठे, प्रा.शिवाजी बारगळ, प्रा.रामचंद्र राऊत,कृष्णा माळवे, डॉ.राजेंद्र शिर्के, इंजि. सुनील वाघ, सुभाष कडू, सतीश मुळे, शंकरराव ओहोळ, अंबादास इरले, अभय गुगळे, सागर गांधी यांच्यासह विजय गांधी परिवारातील नातेवाईक मंडळी विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. पत्रकार अशोक डहाळे यांनी सूत्रसंचालन केले तर अभिजित गांधी यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.हभप सौ.साधनाताई मुळे यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## किडनीने दिले दोन जीवांना नवे आयुष्य | पती आणि आईचा त्याग ठरला प्रेरणादायी

### प्रवरा ग्रामीण रुग्णालयात एकाच दिवशी दोन किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : किडनी निकामी झाल्याने जीवन-मरणाच्या संघर्षात असलेल्या दोन रुग्णांसाठी त्यांचेच कुटुंबीय देवदूत ठरले. एका पत्नीचे प्राण वाचवण्यासाठी पतीने, तर मुलाला नवजीवन देण्यासाठी आईने स्वतःची किडनी दान केली. कौटुंबिक प्रेम, त्याग आणि माणुसकीचा प्रत्यय देणाऱ्या या दोन्ही किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया डॉ. विठ्ठलराव विखे पाटील प्रवरा ग्रामीण रुग्णालय, लोणी येथे एकाच दिवशी यशस्वीपणे पार पडल्या.



पहिल्या प्रकरणात सुनिता प्रवीण साबळे (३३, रा. घारगाव, अकलापूर, ता. संगमनेर) यांच्यावर किडनी प्रत्यारोपण करण्यात आले. पत्नीचे जीवन वाचविण्यासाठी त्यांचे पती प्रवीण सुकदेव साबळे (४२) यांनी स्वतःची एक किडनी दान केली. पत्नीला नवजीवन देण्यासाठी पतीने घेतलेला हा निर्णय पती-पत्नीच्या नात्यातील प्रेम आणि त्यागाचे उदाहरण ठरला.

दुसऱ्या प्रकरणात अनिकेत बन्सी गुंजाळ (२२) यांच्यावर किडनी प्रत्यारोपण करण्यात आले. मुलाचे आयुष्य वाचवण्यासाठी त्यांची आई हीरा बन्सी गुंजाळ (५५, रा. बेल्ही, पुणे) यांनी स्वतःची किडनी दान केली. आईच्या या त्यागातून ममत्वाची अनोखी अनुभूती पाहायला मिळाली. दोन्ही शस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी झाल्याने दोन्ही रुग्णांना नवजीवन मिळाले.

प्रवरा इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेसचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे पाटील यांनी प्रवीण साबळे आणि हीरा गुंजाळ यांच्या अवयवदानाच्या निर्णयाचे विशेष कौतुक केले. या शस्त्रक्रियेत अधिष्ठाता डॉ. सतीश महाजन, रुग्णालय प्रशासक संचालक डॉ. योगींद्र सिंग, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरेश जगदाळे, डॉ. एन. एस. पवार, डॉ. जोर्वेकर, डॉ. तुषार भवर व डॉ. एस. एल. तुंगीकर यांच्यासह वैद्यकीय पथकाने योगदान दिले. अवयव प्रत्यारोपण तज्ज्ञ डॉ. विपिन विभूते यांच्या नेतृत्वाखाली भूलतज्ज्ञ डॉ. मनीष पाठक, डॉ. राहुल तांबे, डॉ. ऋषिकेश वाघोलीकर, डॉ. मयूर गंगवाल, डॉ. रोहन रघुवंशी, डॉ. काजल दरंदले, डॉ. संजय चौधरी, डॉ. अमोल भालेराव, डॉ. सुरजकुमार बांगर आणि डॉ. भाग्यश्री पुराणीक यांनी शस्त्रक्रिया यशस्वी केली. अवयव प्रत्यारोपण समन्वयक ज्ञानेश्वर गाडेकर यांनी नातेवाईक, प्रशासन आणि वैद्यकीय पथकाच्या समन्वयातून हे यश शक्य झाल्याचे सांगितले.




# सी.ए. पास झालो, पण अशोक बँकेत नापास झालो...




मुरकुटे साहेब, ही कबुली नव्हे; सभासद-ठेवीदारांच्या प्रश्नांची सुरुवात आहे!

त्या विश्वासाचे संरक्षण करण्याची जबाबदारी नेमकी कोणाची होती?

काही व्यक्तींची नावे चर्चेत असल्याचे सांगितले जाते. मात्र चौकशीपूर्वी कोणालाही दोषी ठरवणे योग्य नाही. संबंधित व्यक्तींना आपली बाजू मांडण्याची संधी मिळाली पाहिजे. पण चर्चेत असलेल्या प्रत्येक मुद्द्याची निष्पक्ष, स्वतंत्र आणि पारदर्शक चौकशी झालीच पाहिजे. कारण प्रश्न व्यक्तींचा नसून ठेवीदारांच्या पैशांचा आहे.

मुरकुटे साहेबांच्या राजकीय प्रवासाकडे पाहिले तर चार दशकांहून अधिक काळ ते श्रीरामपूर परिसरातील सहकार आणि राजकारणात प्रभावी राहिले आहेत. अशोक कारखाना, अशोक बँक, मुळा-प्रवरा वीज संस्था, स्थानिक स्वराज्य संस्थांपासून शिक्षण क्षेत्रापर्यंत त्यांच्या नेतृत्वाची छाप राहिली आहे. एवढ्या प्रदीर्घ सार्वजनिक जीवनानंतर त्यांच्या नेतृत्वाकडे सामान्य माणूस केवळ राजकीय चष्म्यातून पाहत नाही; तो विश्वासाने पाहतो.

म्हणूनच आज अशोक बँकेच्या संकटाकडे केवळ एका बँकेची आर्थिक अडचण म्हणून पाहणे धोकादायक ठरेल. हा विश्वासाचा प्रश्न आहे.

मुरकुटे साहेब, आपण आक्रमक नेते म्हणून ओळखले जाता. संकटसमयी पुढे येऊन लढणे हीच आपली राजकीय शैली राहिली आहे. मग आज मात्र नापास झालो या नकारात्मक वाक्यावर थांबायचे का?

नाही! आता कबुलीजबाब नको; कृती हवी.

सभासदांना बँकेची खरी आर्थिक स्थिती सांगा. रिझर्व्ह बँकेच्या निर्बंधांमागील कारणांची वस्तुनिष्ठ माहिती जनतेसमोर मांडा. दोषी कोण असेल त्याच्यावर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे, यासाठी पुढाकार घ्या. ठेवीदारांच्या पैशांचे संरक्षण कसे होणार, याचा स्पष्ट आराखडा द्या. बँकेला पुन्हा सक्षम करण्यासाठी तज्ज्ञांची मदत घ्या. संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी आणि संबंधित यंत्रणांची जबाबदारी निश्चित करण्यासाठी पारदर्शक चौकशीची मागणी करा. चौकशीअंती दोषी सिद्ध होणाऱ्यावर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करा.

आणि सर्वांत महत्त्वाचे, ठेवीदारांच्या बाजूने उभे राहा. कारण आज अशोक बँकेचा प्रश्न केवळ भानुदास मुरकुटे यांचा नाही, संचालक मंडळाचा नाही, अधिकाऱ्यांचा नाही. हा त्या वृद्ध ठेवीदाराचा प्रश्न आहे ज्याने आयुष्यभराची बचत बँकेत ठेवली. त्या शेतकऱ्याचा प्रश्न आहे ज्याने कष्टाने जमवलेला पैसा खात्यात ठेवला. त्या व्यापाऱ्याचा प्रश्न आहे ज्याच्या व्यवसायाची उलाढाल बँकेवर अवलंबून आहे. त्या सामान्य सभासदाचा प्रश्न आहे ज्याने संस्थेवर डोळे झाकून विश्वास ठेवला. हा विश्वास मोडू देऊ नका!

मुरकुटे साहेब, आपण म्हणता, सी.ए. पास झालो, पण अशोक बँकेत नापास झालो. ठीक आहे. पण परीक्षा अजून संपलेली नाही. अंतिम निकाल आता लागणार आहे.

आपण या संकटातून अशोक बँकेला बाहेर काढण्यासाठी काय करता, ठेवीदारांच्या पैशासाठी किती ताकदीने लढता आणि संस्थापक म्हणून आपली नैतिक जबाबदारी किती प्रामाणिकपणे पार पाडता, यावरच जनतेचा पुढील निर्णय ठरेल. आपल्या नेतृत्वाची खरी परीक्षा आता सुरू झाली आहे.

नकारात्मक कबुलीजबाब देऊन बाजूला होणे मुरकुटे यांच्या व्यक्तिमत्त्वाला शोभणारे नाही. ज्या आत्मविश्वासाने अशोक कारखाना उभा केला, ज्या आक्रमकतेने राजकारण केले, त्याच आक्रमकतेने आता अशोक बँकेच्या संकटावर तुटून पडा. ठेवीदारांचा पैसा वाचवा. सभासदांचा विश्वास वाचवा.

संस्थेची प्रतिष्ठा वाचवा. आणि दोष कुणाचाही असो, तो जनतेसमोर आणा.

मुरकुटे साहेब, मी नापास झालो एवढ्यावर विषय संपत नाही. जनतेचा प्रश्न आहे करे, नापास कोण झाले, हे नंतर ठरेल; पण ठेवीदारांच्या पैशांचे काय? अशोक बँकेचे भविष्य काय? आणि या संकटाची जबाबदारी कोण घेणार? याचे उत्तर कृतीतून द्या!

भानुदास मुरकुटे यांचा राजकीय वारस म्हणून नीरज मुरकुटे यांच्याकडे पाहिले जाते. अशोक सहकारी साखर कारखान्यावर तज्ज्ञ संचालक म्हणून त्यांची नियुक्ती झाल्याने त्यांच्या सार्वजनिक आणि सहकारी क्षेत्रातील प्रवासाची सुरुवातही याच संस्थात्मक वर्तुळातून होत आहे. अशा वेळी त्यांच्या आजोबांच्या नेतृत्वाखाली उभ्या राहिलेल्या अशोक बँकेवर रिझर्व्ह बँकेचे निर्बंध येणे, ही केवळ मुरकुटे यांचीच नव्हे तर त्यांच्या पुढील पिढीसमोरचीही मोठी कसोटी आहे.

राजकीय वारसा हा केवळ पदांचा वारसा नसतो; तो विश्वासाचा वारसा असतो. नीरज मुरकुटे यांना भविष्यात सहकार आणि राजकारणात मोठी भूमिका बजावायची असेल, तर आज अशोक संस्थांबाबत निर्माण झालेले प्रश्न त्यांच्या पिढीसमोरही उभे राहणार आहेत. त्यामुळे मुरकुटे साहेबांनी या संकटातून अशोक बँकेला बाहेर काढणे, ठेवीदारांचा विश्वास पुनर्स्थापित करणे आणि संस्थांच्या कारभाराबाबत पारदर्शकता निर्माण करणे, ही केवळ वर्तमानाची गरज नाही; ती त्यांच्या राजकीय वारशाचीही खरी परीक्षा आहे.

नीरज मुरकुटे यांच्यावर कोणताही दोषारोप करण्याचा प्रश्नच नाही. ते या संकटासाठी जबाबदार आहेत, असे म्हणण्याचे कारणही नाही. पण ज्या घराण्याचा राजकीय वारसा पुढे नेण्याची अपेक्षा आहे, त्या घराण्याच्या संस्थात्मक वारशाची आज होत असलेली परीक्षा त्यांच्यासाठीही महत्त्वाची आहे. आजोबांनी उभ्या केलेल्या संस्थांचा विश्वास वाचवला, तरच उद्याचा वारसा अभिमानाने पुढे नेता येईल.

म्हणूनच मुरकुटे साहेबांसमोर आज एकच आव्हान आहे. मी नापास झालो असे सांगण्याऐवजी अशोक बँकेला पुन्हा उभे करून आपण आणि आपल्या पुढच्या पिढीसमोरचा विश्वासाचा पेपर पास करून दाखवा..!

## 'इच्छापूर्ती प्रतिष्ठान'च्या सामाजिक कार्याला भरीव मदत करणार : खा. वाकचौरे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करून इच्छापूर्ती प्रतिष्ठानने समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. प्रतिष्ठानचे सामाजिक उपक्रम दिशादर्शक असून, भविष्यात या कार्याला भरीव मदत करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी केले.

राहुरी फॅक्टरी येथील इच्छापूर्ती प्रतिष्ठानतर्फे शिर्डी येथे धार्मिक, राजकीय, उद्योग, अध्यात्म, वैद्यकीय, पत्रकारिता, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून खा. वाकचौरे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार चंद्रशेखर कदम होते.

यावेळी माजी मंत्री बबनराव घोलप, नाशिक म्हाडाचे माजी अध्यक्ष शिवाजीराव ढवळे, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, शिवसेना अध्यात्मिक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष अक्षय महाराज भोसले, ज्ञानेश्वर माऊली जळकेकर, पांडुरंग महाराज वावीकर, महंत अर्जुन महाराज तनपुरे, शिर्डी संस्थानचे माजी विश्वस्त सुरेश वाबळे, साई आदर्श मल्टिस्टेटचे



चेअरमन शिवाजीराव कपाळे आदी उपस्थित होते. प्रतिष्ठानच्या कार्याचे कौतुक करताना खा. वाकचौरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून प्रतिष्ठानच्या सामाजिक कार्यासाठी भरीव योगदान मिळवून देण्याचे आश्वासन दिले. तसेच अक्षय महाराज भोसले यांनी प्रतिष्ठानतर्फे उभारण्यात येणाऱ्या वृद्धाश्रम व अनाथाश्रमासाठी आर्थिक मदत देण्याची घोषणा केली.कार्यक्रमास अभिनेत्री प्रतीक्षा आगळे, सुनीता कोते, सर्वेश जोशी, सागर साठे, उद्योजक हौशाबापू शिंदे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अध्यक्ष संपत महाराज जाधव, उपाध्यक्ष गणेश भांड, सचिव हिंदुभूषण दत्ता गागरे, खजिनदार सतीश ढोकणे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन राजेंद्र टाक यांनी केले.

## देवगाव अतिक्रमण वाद; जातीय तेढ निर्माण करणाऱ्या यूट्यूब विरोधात पोलिसांत तक्रार!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** नेवासा तालुक्यातील देवगाव येथील श्रीराम मंदिर देवस्थानच्या मालकीच्या गटामधील अतिक्रमणाच्या वादावरून आता यूट्यूबवर प्रसारित झालेल्या बातमी विरोधात ग्रामस्थांनी नेवासा पोलिसांकडे धाव घेतली आहे. बातमीत चुकीची माहिती देऊन जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करत पोलिस निरीक्षकांकडे लेखी तक्रार देण्यात आली.

दिनांक ३० ऑगस्ट रोजी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की,श्रीराम मंदिर देवस्थानच्या गट नं. ५३९ मध्ये मंगल कार्यालय व भक्तनिवासाचे काम सुरू असून, अतिक्रमणाबाबत ग्रामस्थांनी दि. ७ ऑगस्ट रोजी पोलिस व तहसीलदारांकडे निवेदन दिले होते. त्यानंतर काही अतिक्रमणधारकांनी अतिक्रमण काढून घेतले. मात्र, चव्हाण कुटुंबीयांनी अतिक्रमण काढले नसल्याने ग्रामस्थांनी चर्चा करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी वाद झाला.

दरम्यान, दि. ३० ऑगस्ट रोजी यूट्यूबवर प्रसारित झालेल्या बातमीत वस्तुस्थितीचा विपर्यास करून खोटे-नाटे वृत्त देण्यात आल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. विजय चव्हाण यांच्या आजाराबाबतही चुकीची माहिती प्रसारित करून त्यांची बदनामी केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या प्रकरणात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता मधील कलम १६८ अन्वये दि. २८ ऑगस्ट रोजी प्रतिबंधात्मक नोटीस देण्यात आल्याचा उल्लेख तक्रारीत आहे. तरीही चुकीचे वृत्त प्रसारित करून जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. याप्रकरणी संबंधित बातमीची चौकशी करून संबंधित यूट्यूबवर कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणी मा.आमदार बाळासाहेब मुरकुटे,अजित मुरकुटे, बाळासाहेब यादव, राहुल शिंदे,रणजीत आगळे,मच्छिंद्र पाडळे, नरेंद्र जोशी, दिगंबर आगळे,सरपंच रामभाऊ तागड, विवेक जोशी,दत्तात्रय लांपे,नवनाथ गव्हाणेआदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. तक्रारीतील आरोपांची सत्यता पोलिसांच्या चौकशीनंतर स्पष्ट होणार आहे.

## शेडगाव ते निझर्णेश्वर पायी दिंडीचे प्रस्थान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**आश्वी |** श्री क्षेत्र शेडगाव ते श्री क्षेत्र निझर्णेश्वर पायी दिंडीचे श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवारी (दि. ३१) मोठ्या उत्साहात प्रस्थान झाले. सकाळी १० वाजता मुक्ताई मंदिर परिसरातून 'ज्ञानोबा-माऊली-तुकाराम'च्या जयघोषात आणि अत्यंत मंगलमय वातावरणात या दिंडीने प्रस्थान केले.पायी चालत निघालेली ही दिंडी दुपारी उंबरी बाळापूर (ता. संगमनेर) येथे पोहोचली. वारकरी संप्रदायाचे पाईक असलेले येथील सुरेश भुसाळ यांच्या निवासस्थानी दिंडीचे आगमन झाले. दिंडी पोहोचताच भुसाळ कुटुंबीयांनी दिंडीतील सर्व महिला आणि पुरुष वारकऱ्यांचे अत्यंत भक्तीभावाने आणि उत्साहात स्वागत केले.दरम्यान, याप्रसंगी सुरेश भुसाळ यांनी सपत्नीक वारकऱ्यांचे दर्शन घेतले. यानंतर सर्व वारकऱ्यांनी सात्विक भोजनाचा आस्वाद घेतला. त्यानंतर, विठ्ठलाच्या नामस्मरणात आणि टाळ-मृदंगाच्या निनादात ही दिंडी श्री क्षेत्र निझर्णेश्वरच्या दिशेने पुन्हा मार्गस्थ झाली.

## श्रीरामपूरच्या मातीतून युरोपियन क्रिकेटविश्वात झेप

गौरव डेंगळे | राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर :**एखाद्या छोट्या शहरातून सुरू झालेला प्रवास मेहनत, सातत्य आणि दूरदृष्टीच्या बळावर आंतरराष्ट्रीय व्यासपीठापर्यंत पोहोचतो, तेव्हा त्याची कहाणी अनेकांसाठी प्रेरणादायी ठरते. श्रीरामपूरचे सुपुत्र, क्रीडा क्षेत्रातील व्यक्तिमत्त्व आणि क्रीडा प्रशासक पार्थ सुरेश दोशी यांनी अशीच अभिमानास्पद झेप घेतली आहे. प्रतिष्ठेच्या Euopean T20 Pemie League (ETPL) मधील Glasgow Cosmic फ्रँचायझीच्या Advisoपदी त्यांची नियुक्ती झाली आहे.

विशेष म्हणजे, ऑस्ट्रेलियाचे माजी दिग्गज क्रिकेटपटू मॅथ्यू हेडन यांच्याशी संबंधित असलेल्या याच Glasgow Cosmic संघात पार्थ दोशी यांनाही सल्लागाराची जबाबदारी मिळाली आहे. त्यामुळे त्यांच्या नियुक्तीला आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या पटलावर विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.स्थानिक पातळीवरून क्रीडा क्षेत्रातील वाटचाल सुरू करणाऱ्या दोशी यांनी क्रीडा प्रशासन, खेळाडू विकास, संघटनात्मक नियोजन आणि विविध क्रीडा उपक्रमांच्या माध्यमातून आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. स्थानिक मैदानांपासून राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा व्यवस्थापन आणि आता युरोपियन क्रिकेटपर्यंत पोहोचलेला त्यांचा प्रवास श्रीरामपूरच्या तरुणांसाठी विशेष प्रेरणादायी ठरत आहे.ढ२० क्रिकेटच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे जगभरातील लीगमध्ये खेळाडूंसोबतच क्रीडा व्यवस्थापन, फ्रँचायझी नियोजन, प्रतिभाविकास आणि व्यावसायिक धोरणांना मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. अशा वेळी Glasgow Cosmicm Advisoपदाची जबाबदारी दोशी यांच्या अनुभवाची आणि नेतृत्वक्षमतेची दखल घेतल्याचे मानले जात आहे.श्रीरामपूरसारख्या शहरातून पुढे आलेल्या व्यक्तीला आंतरराष्ट्रीय क्रिकेट फ्रँचायझीमध्ये महत्त्वाची जबाबदारी मिळणे ही केवळ वैयक्तिक यशाची बाब नसून, स्थानिक क्रीडा क्षेत्रासाठीही मोठी प्रेरणादायी घटना आहे. त्यांच्या या यशामुळे श्रीरामपूर आणि परिसरातील क्रीडा क्षेत्रातील नवोदितांना 'आपल्या शहरातूनही आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचता येते' हा आत्मविश्वास मिळणार आहे.मेहनत, सातत्य, संघटन कौशल्य आणि भविष्याचा वेध घेणारी दृष्टी यामुळे पार्थ दोशी यांची ही आंतरराष्ट्रीय झेप श्रीरामपूरच्या क्रीडा इतिहासात निश्चितच अभिमानाचा नवा अध्याय ठरली आहे.

## आ. पाचपुते यांचे 'स्कूल देखो' अभियान जिल्हा परिषद शाळांना अचानक भेटी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



श्रीगोंदा | 'बलवान भारत, सामर्थ्यवान देश घडवायचा असेल तर शालेय पिढी सक्षम केली पाहिजे,' हे धोरण समोर ठेवत श्रीगोंदा-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी मतदारसंघातील जिल्हा परिषद शाळांच्या प्रत्यक्ष पाहणीला सुरुवात केली आहे. कार्यालयात बसून कागदोपत्री अहवाल पाहण्याऐवजी थेट शाळांच्या दारात पोहोचून तेथील शैक्षणिक आणि भौतिक स्थिती जाणून घेण्याच्या या उपक्रमाला 'स्कूल देखो' अभियान असे स्वरूप प्राप्त झाले आहे.

या अभियानांतर्गत आमदार पाचपुते यांनी मतदारसंघातील जिल्हा परिषद शाळांना अचानक भेटी देत विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळा ठरणाऱ्या समस्या शोधण्यास सुरुवात केली आहे. शाळेत पोहोचल्यानंतर शिक्षक, विद्यार्थी आणि शालेय व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधून प्रत्यक्ष परिस्थिती जाणून घेतली जात आहे. केवळ समस्या ऐकून न घेता त्यावर कोणत्या उपाययोजना करता येतील, याचाही जागेवरच आढावा घेतला जात आहे.

### नारायण आश्रम शाळेला भेट

या दौऱ्यांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नारायण आश्रम येथे आमदार पाचपुते यांनी प्रत्यक्ष भेट देऊन शाळेतील शैक्षणिक वातावरण, मूलभूत सुविधा आणि विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या अडचणींची पाहणी केली. यावेळी त्यांनी शिक्षकांशी तसेच विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. शाळेसमोरील प्रश्न, आवश्यक सुविधा आणि प्राधान्याने करावयाच्या कामांची माहिती त्यांनी घेतली. विद्यार्थ्यांना सुरक्षित, दर्जेदार आणि सुविधायुक्त शैक्षणिक वातावरण मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि अन्य मूलभूत सुविधांबाबत आवश्यक त्या उपाययोजनांचा पाठपुरावा करण्याचे आश्वासन यावेळी देण्यात आले.

### 'अहवाल नको, प्रत्यक्ष पाहणी हवी'

शाळांच्या समस्या केवळ कागदोपत्री अहवालातून समजून घेण्याऐवजी प्रत्यक्ष शाळेत जाऊन त्याची वस्तुस्थिती जाणून घेण्यावर या अभियानात भर देण्यात येत आहे. 'शाळेत चला, समस्या समजून घ्या आणि उपाययोजना करा' या भूमिकेतून आमदार पाचपुते यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी, अपेक्षा आणि शाळेबाबतच्या गरजा जाणून घेतल्या.

शिक्षणाच्या पायाभूत सुविधांना बळ देणे म्हणजे विद्यार्थ्यांच्या भविष्याला दिशा देणे, या भूमिकेतून मतदारसंघातील शाळांचा प्रत्यक्ष आढावा घेतला जात आहे. शाळांच्या गरजा आणि प्रलंबित प्रश्न समोर आल्यानंतर संबंधित विभागांशी समन्वय साधून ते प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा केला जाणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

### थेट शाळेत, थेट विद्यार्थ्यांशी संवाद

या शाळा भेटीदरम्यान गटशिक्षणाधिकारी, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व सदस्य, शिक्षकवर्ग तसेच विद्यार्थी उपस्थित होते. कार्यालयात बसून शाळांची माहिती घेण्यापेक्षा प्रत्यक्ष शाळेत जाऊन शिक्षक आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधणे, हा या अभियानाचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे शाळांच्या प्रत्यक्ष अडचणी, सुविधांची गरज आणि विद्यार्थ्यांच्या अपेक्षा थेट लोकप्रतिनिधींसमोर मांडण्याचा मार्ग खुला झाला आहे. शाळेच्या चार भिंतींची पाहणी नव्हे, तर त्या भिंतीआड घडणाऱ्या भविष्याची पाहणी असा या 'स्कूल देखो' अभियानाचा केंद्रबिंदू असल्याचे चित्र या भेटीतून दिसून आले.

## उक्कलगाव-पटेलवाडी परिसरात बिबट्याचा वावर वाढला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**उक्कलगाव :** श्रीरामपूर तालुक्यातील उक्कलगाव येथील पटेलवाडी शिवारात थोरात वस्ती नजीकच्या रस्त्यावर बिबट्याने भरदिवसा दर्शन दिल्याने परिसरातील नागरिकांमध्ये आणि शेतकऱ्यांमध्ये तीव्र भीतीचे वातावरण पसरले आहे.या भागात बिबट्याचा वावर वाढल्याने त्याने कुत्र्यांवर हल्ले चढवण्यास सुरुवात केली असून, पाळीव प्राण्यांना आपली शिकार बनवले आहे.आधीच पावसाची अनिश्चितता आणि महावितरणच्या विजेच्या लपंडावामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. पिके पाण्याअभावी सुकू लागल्याने मोठे आर्थिक संकट ओढवले असतानाच, आता बिबट्याच्या धुमाकूळामुळे शेतकऱ्यांसमोर नवे आणि मोठे संकट उभे ठाकले आहे. शेतात काम करणे किंवा बाहेर पडणेही मुश्कील झाले आहे.या गंभीर समस्येची तातडीने दखल घेऊन वनविभागाने पटेलवाडी येथील थोरात वस्ती परिसरात तत्काळ पिंजरा लावावा आणि बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी आक्रमक मागणी त्रस्त शेतकऱ्यांकडून होत आहे.

## राज्यस्तरीय फिन स्विमिंग स्पर्धेत विखे सैनिक स्कूलची चमकदार कामगिरी

### कॅडेट साईराज अदनाकची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड; राजवर्धन पाटीललाही कांस्यपदक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लोणी:**पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सैनिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी नाशिक येथे झालेल्या राज्यस्तरीय फिन स्विमिंग अजिंक्यपद स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली. कॅडेट साईराज अदनाक याने सरफेस स्विमिंग प्रकारात एक रौप्य व एक कांस्यपदक पटकावून राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली.

अंडरवॉटर स्पोर्ट्स फेडरेशन ऑफ इंडिया व अंडरवॉटर स्पोर्ट्स फेडरेशन ऑफ नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत पुणे, मुंबई, ठाणे, नागपूर, अमरावती, कोकण, सोलापूरसह संपूर्ण महाराष्ट्रातून सुमारे ३५० जलतरणपटूंनी सहभाग घेतला होता.

कॅडेट साईराज अदनाकने सरफेस स्विमिंगमध्ये दमदार कामगिरी करत दोन पदकांची कमाई केली. त्याच्या या यशामुळे त्याची राष्ट्रीय स्तरावरील जलतरण स्पर्धेसाठी निवड झाली आहे. कॅडेट राजवर्धन पाटील यानेही उत्कृष्ट क्रीडाकौशल्याचे प्रदर्शन करत 'अप्निया' प्रकारात कांस्यपदक मिळविले.

या खेळाडूंना सैनिक स्कूलचे कमांडंट कर्नल सुभाष, प्राचार्य राजेश माघाडे व प्रशिक्षक अखिल शेख यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रातही प्रोत्साहन दिले जाते. विविध खेळांसाठी विशेष प्रशिक्षण व आवश्यक



सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे विद्यार्थ्यांची क्रीडा क्षेत्रातील कामगिरी उंचावत असल्याचे प्राचार्य राजेश माघाडे यांनी सांगितले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, शालिनीताई विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील, डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्यासह संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन केले.

## गणेश मंडळांच्या परवानगीसाठी 'एक खिडकी योजना' सुरू करा : आ. अमोल खताळ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर संगमनेर शहर व ग्रामीण भागातील विविध समस्या तातडीने मार्गी लावून उत्सव शांततेत, सुरक्षित आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडण्यासाठी प्रशासनाने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना आ. अमोल खताळ यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. गणेश मंडळांना विविध विभागांच्या परवानग्या घेण्यासाठी होणारी गैरसोय टाळण्यासाठी नगरपालिकेने तातडीने 'एक खिडकी योजना' सुरू करावी, अशी मागणीही त्यांनी केली. यशवंतराव चव्हाण प्रशासकीय भवनातील सभागृहात सोमवारी (दि. ३१) गणेशोत्सवाच्या नियोजनाबाबत विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. यावेळी वाहतूक, रस्ते, वीजपुरवठा, कायदा व सुव्यवस्था तसेच गणेश मंडळांच्या परवानग्यांबाबत चर्चा झाली. ावसामुळे शहरातील रस्त्यांवर मोठे खड्डे पडले असून, गणेशोत्सव काळात वाढणाऱ्या गर्दीमुळे अपघाताचा धोका आहे. त्यामुळे खड्डे तातडीने बुजवावेत. तसेच रस्त्यांवरील मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा, अशा सूचना खताळ यांनी दिल्या. गणेश मंडळांच्या देखाव्यांसाठी व विद्युत रोषणाईसाठी लोंबकळणाऱ्या वीजवाहक तारांची पाहणी करून दुरुस्ती करावी. संवेदनशील ठिकाणी पोलिसांची गस्त वाढवून रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करावी, असेही त्यांनी सांगितले.



बैठकीस उपविभागीय अधिकारी अरुण उंडे, तहसीलदार धीरज मांजरे, पोलीस उपअधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## रक्षेचे नदीत विसर्जन टाळत वृक्षाच्या मुळाशी ठेवली रक्षा, 'एक व्यक्ती-एक वृक्ष'चा संदेश

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी:**संगमनेर तालुक्यातील खळी गावातील ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व, राजहंस दूध संघाचे उपाध्यक्ष व खळीचे उपसरपंच राजेंद्र नामदेव चकोर आणि सुधीर नामदेव चकोर यांचे वडील कै. नामदेव धोंडीबा चकोर यांचे शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट रोजी वयाच्या ९०व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या रक्षा विसर्जनाच्या निमित्ताने चकोर परिवाराने पारंपरिक प्रथेला पर्यावरण संवर्धनाची जोड देत अनोखा आदर्श निर्माण केला.अंत्यसंस्कारानंतर रक्षा नदीत विसर्जित न करता घरासमोर वृक्षारोपण करून त्या वृक्षाच्या मुळाशी रक्षा ठेवण्यात आली. पूर्वजांच्या स्मृती जपतानाच पर्यावरणाचे रक्षण करण्याचा हा उपक्रम उपस्थितांच्या भावनांना स्पर्शून गेला.रक्षेचे नदीत विसर्जन करण्याऐवजी वृक्षाच्या रूपाने वडिलांच्या स्मृती जतन करणे, हीच त्यांना खरी श्रद्धांजली आहे, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. चकोर परिवाराच्या या निर्णयातून अंत्यसंस्कारानंतरच्या परंपरांमध्येही पर्यावरणपूरक बदल करता येतो, हा संदेश समाजासमोर आला.या वेळी चंद्रभान तांबे, सुरेश नागरे, बाळासाहेब वाघमारे, तुकाराम घुगे, भानुदास उगलमुगले, भाऊसाहेब नागरे, सूर्यभान सानप, बाळासाहेब आव्हाड, दिलीप घुगे, सोन्याबापू लबडे, छबू उगलमुगले, वेणुनाथ सानप, पांडू घुगे यांच्यासह चकोर परिवारातील सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.'एक व्यक्ती-एक वृक्ष'चा संदेश देणारा हा उपक्रम इतरांसाठीही प्रेरणादायी ठरावा, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## एकल महिलांसाठी नगरसेविका स्नेहल खोरेंचा पुढाकार

**श्रीरामपूर** : महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत एकल महिलांचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने श्रीरामपूर नगरपालिकेच्या नगरसेविका स्नेहल केतन खोरे व मोरया फाउंडेशनचे अध्यक्ष केतन खोरे यांच्या पुढाकाराने पूर्णवादनगर येथे एकल महिला सर्वेक्षण कॅम्प घेण्यात आला. या कॅम्पमध्ये १५७ एकल महिलांनी सहभाग नोंदवून सर्वेक्षणासाठी नोंदणी केली. यावेळी स्नेहल खोरे म्हणाल्या की, शासनाने एकल महिलांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्यासाठी हे सर्वेक्षण सुरू केले आहे. सर्वेक्षणामुळे शासकीय योजनांचा लाभ मिळण्यास पात्र असलेल्या गरजू महिलांची नोंद होऊन त्यांना विविध योजनांचा लाभ मिळण्यास मदत होणार आहे. यावेळी मुकुंद टंकसाळे, रेखा चाटे, हरीश पैठणे, भारती देशमुख, लता गायकवाड, अनिता खरबस, मीना म्होपरे, प्रतिक्षा सातदिवे, कुणाल दहिटे, तुषार चांडवले, विशाल रुपनर, विजय पाटील, सूरज आहेर, संदीप गायकवाड आदी उपस्थित होते.

## शितल गोरे यांचे अंबिका पतसंस्थेचे सभासदत्व रद्दचा निर्णय कायम

**श्रीरामपूर** : अंबिका महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या सभासद शितल भाऊसाहेब गोरे यांचे सभासदत्व रद्द करण्याचा निर्णय कायम ठेवण्यात आला आहे. संस्थेच्या सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयाविरोधात गोरे यांनी सहकार विभाग प्राधिकरणाकडे अपील केले होते. मात्र, अपिलावरील निकालात सभासदत्व रद्द करण्याचा निर्णय कायम ठेवण्यात आला. पतसंस्थेच्या कामकाजाबाबत चुकीची व दिशाभूल करणारी माहिती सोशल मीडियावर प्रसारित करून संस्थेची प्रतिमा मलिन केल्याचा ठपका गोरे यांच्यावर ठेवण्यात आला होता.

तसेच सभासदांची दिशाभूल करून पतसंस्थेच्या नावाला व हिताला बाधा निर्माण केल्याचे संस्थेने म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर दि. ३० सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत गोरे यांचे सभासदत्व रद्द करण्याचा ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला होता. या ठरावाला सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, श्रीरामपूर व विभागीय सहनिबंधक संस्था, नाशिक यांनी मान्यता दिली होती.

## सात्रळ येथे अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

**सोनगाव** : राहुरी तालुक्यातील सात्रळ येथील हनुमान मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, २९ ऑगस्ट रोजी ह.भ.प. दत्तगिरीजी महाराज यांच्या हस्ते ध्वजारोहण करून सोहळ्यास प्रारंभ झाला. ३० ऑगस्ट ते ७ सप्टेंबरदरम्यान दररोज विविध संत-महंतांची कीर्तनसेवा होणार आहे. यामध्ये ह.भ.प. कल्याण महाराज काळे, ज्ञानेश्वर महाराज वाबळे, अर्जुन महाराज तनपुरे, शालिनीताई निवृत्ती देशमुख महाराज, विकास महाराज यादव व स्वामी अरुणनाथगिरीजी महाराज यांचा सहभाग राहणार आहे. ७ सप्टेंबर रोजी ह.भ.प. गुरुचरण महाराज वामन व ह.भ.प. नवनाथ महाराज म्हस्के यांच्या काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसाद होईल. ८ सप्टेंबर रोजी संतसेना महाराज पुण्यतिथीनिमित्त ह.भ.प. हरिभाऊ महाराज लोंढे यांच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे. भाविकांनी या धार्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रामस्थांनी केले आहे.

# भरपूर पाऊस पडून शेतकरी सुखी व्हावा : आ. खताळ

### तिसऱ्या श्रावणी सोमवारी विविध महादेव मंदिरांत महाअभिषेक व महाआरती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : तालुक्यात सर्वत्र समाधानकारक पाऊस पडून शेतशिवारात भरघोस पीक यावे, बळीराजा सुखी व समाधानी व्हावा, यासाठी बाळेश्वर, खांडेश्वर, रामेश्वर, नागेश्वर व कनकेश्वर महादेवाच्या चरणी प्रार्थना केली असल्याचे आ. अमोल खताळ यांनी सांगितले. तिसऱ्या श्रावणी सोमवारनिमित्त आमदार अमोल खताळ व त्यांच्या पत्नी नीलम खताळ यांनी जवळे-बाळेश्वर येथे बाळेश्वर महादेवाची विधिवत पूजा व महाअभिषेक करून महाआरती केली. त्यानंतर खांडगाव येथील खांडेश्वर-कपालेश्वर, धांदरफळ येथील नागेश्वर तसेच रामेश्वर मंदिरात भेट देऊन महादेवाची पूजा, महाअभिषेक व महाआरती करण्यात आली.



आ. खताळ म्हणाले, भारत हा कृषिप्रधान देश असून बळीराजा सुखी राहिला तर देशाची आर्थिक व्यवस्था भक्कम राहते.

यंदा तालुक्यात काही भागांत चांगला, तर काही भागांत कमी पाऊस झाला आहे. शेतीसाठी पुरेसा पाऊस आवश्यक असल्याने यंदा सर्वत्र चांगला पाऊस पडावा, शेतकऱ्यांच्या शेतात भरघोस पीक यावे, तसेच सर्वांना सुख, समृद्धी व उत्तम आरोग्य लाभावे, यासाठी महादेवाच्या चरणी प्रार्थना केली. तालुक्यातील धार्मिक स्थळांचा विकास करणे ही आपली जबाबदारी असून, भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. धार्मिक स्थळांच्या विकासासोबतच नागरिकांच्या मूलभूत सुविधांकडेही लक्ष दिले जात आहे.

निवडणुकीपुरते राजकारण करून त्यानंतर परिसराच्या विकासाला प्राधान्य देत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### ‘दीड वर्षांत रेल्वेसाठी प्रामाणिक प्रयत्न’

पुणे-नाशिक रेल्वे संगमनेर मार्गेच गेली पाहिजे, यासाठी आपले प्रामाणिक प्रयत्न सुरू असल्याचे आमदार खताळ यांनी सांगितले. नाशिक-शिर्डी-अहिल्यानगर-पुणे रेल्वेमार्गाची अधिसूचना नुकतीच जारी झाली असली तरी हा मार्ग संगमनेरमार्गे प्रस्तावित पुणे-नाशिक रेल्वेमार्गापेक्षा वेगळा आहे. जीएमआरडीच्या अडथळ्यावर तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली असून, समितीला ६० दिवसांचा कालावधी देण्यात आला आहे. त्यामुळे समितीच्या अहवालाची प्रतीक्षा करून राज्य सरकारवर विश्वास ठेवणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

# दुधेश्वर गडाला ‘क’ वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा द्या

### भाविक, इतिहास अभ्यासकांची शासनाकडे आग्रही मागणी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यात निमगाव जाळी परिसरात असलेल्या ऐतिहासिक दुधेश्वर गडाला शासनाने तातडीने ‘क’ वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा द्यावा, अशी मागणी भाविक, ग्रामस्थ, इतिहास अभ्यासक आणि ट्रेकर्समधून जोर धरत आहे. अकराव्या शतकाचा ऐतिहासिक वारसा, पौराणिक महत्त्व आणि कळसूबाई डोंगररांगेतील निसर्गसौंदर्यामुळे दुधेश्वर गड सध्या आकर्षणाचे केंद्र बनला आहे. सह्याद्री पर्वतरांगेची उपरांग असलेल्या कळसूबाई डोंगररांगेचे हे शेवटचे टोक मानले जाते. पायथ्यापासून मंदिरापर्यंत सुमारे २५ मिनिटांत पायी पोहोचता येत असल्याने तरुणाईमध्ये या ठिकाणाची लोकप्रियता वाढत आहे. अहिल्यानगर, नाशिक, छत्रपती संभाजीनगरसह संगमनेर, लोणी, कोपरगाव, राहाता व श्रीरामपूर परिसरातून मोठ्या संख्येने भाविक व ट्रेकर्स येथे येतात. स्थानिक ग्रामस्थ व भाविकांनी लोकवर्गणीतून गडाकडे जाणारा रस्ता आणि पायऱ्यांची व्यवस्था केली आहे. मात्र वाढती गर्दी लक्षात घेता पायऱ्यांचे मजबुतीकरण, सुरक्षित रेलिंग, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, कचरा व्यवस्थापन आणि प्रकाश व्यवस्था या सुविधा तातडीने उपलब्ध होणे गरजेचे आहे. सरदार त्रिंबकजी डेंगळे यांच्या १९६ व्या पुण्यतिथीनिमित्त इतिहास अभ्यासक डॉ. विजय वदक व सुमित डेंगळे यांच्या संकल्पनेतून आणि गोविंदा उद्योगसमूहाच्या सहकार्याने गडावर नीलफलक बसविण्यात आला आहे. या माध्यमातून दुधेश्वरच्या प्राचीन इतिहासाची माहिती पर्यटकांना मिळत आहे. दुधेश्वर परिसराचा नियोजनबद्ध विकास होण्यासाठी शासनाने ‘क’ वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी डॉ. विजय वदक यांनी केली.

# पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन १९ बंधारे पुन्हा भरले

### पावसाने ओढ दिल्याने शेतकऱ्यांना दिलासा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा** : सप्टेंबर महिना सुरू झाला असतानाही परिसरात समाधानकारक पाऊस झालेला नसल्याने खरीप पिकांना पाण्याची नितांत गरज निर्माण झाली आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन जलसंपदा विभागाने परिसरातील १९ बंधारे व तळी पुन्हा पाण्याने भरून दिली आहेत. त्यामुळे पुणतांबा, गोंडेगाव परिसर, सांबरे-सांगळे वस्ती, श्रीरामपूर रोड तसेच परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. यापूर्वी ना. राधाकृष्ण विखे यांच्या सूचनेनुसार परिसरातील बंधारे व तळी पाण्याने भरून देण्यात आली होती. मात्र त्यानंतर पाण्याचा मोठ्या प्रमाणात पाझर व जमिनीत मुरण्यामुळे काही ठिकाणी पाणीसाठा कमी झाला होता. परिणामी खरीप पिकांना पाण्याची चिंता निर्माण झाली होती. शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेऊन डॉ. धनंजय धनवटे यांनी नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पुन्हा बंधारे व तळी भरण्याची मागणी केली. त्यानंतर जलसंपदा विभागाकडे पाठपुरावा करण्यात आला.

प्रो.फी. जमा.रु.
पान नं,

**सायटेशन नोटीस**

दि.२४.०८.२०२६

**शेवगाव येथील तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी शेवगाव यांचे कोर्टात**

चौ.अ.नं.

अर्जदार
श्री. आदिनाथ पोपट भागवत, रा. नेवासा,, ता. नेवासा.
सामनेवाला
सरकार

सदर अर्जदार हा मौजे शेवगाव येथील रहीवाशी आहे. सदर अर्जदार श्री आदिनाथ पोपट भागवत. रा. नेवासा, ता. नेवासा यांची मुलगी सुहानी आदिनाथ भागवत हिचा जन्म दि.२२.०५.२०१९ रोजी झाल्याची नोंद नगरपरिषद शेवगाव अभिलेखपाल येथे जन्माचा दाखला मिळणे बाबत अर्जदार यांनी अर्ज केला असता अर्जदार यांना नोंदी आढळ होत असल्याचे कळविण्यात आले आहे. जन्माची नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांच्या मुलीची जन्माची नोंदणी प्रमाणपत्र (जन्म दिनांक नोंदणी दाखला) मिळु शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदार यांचे शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अर्जदार यांच्या मुलीची जन्माची नोंद पंचायत समिती कार्यालय, शेवगाव यांच्या जन्म मृतु नोंदणी रजिस्टरला नोंद घेवुन तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे. सदर अर्जदार यांनी नगरपरिषद ग्रामपंचायत येथील शेवगाव येथे जावुन जन्म प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता नोंद नसल्याने त्या कार्यालयात जन्मधी नोंद असलेबाबत नगरपरिषद शेवगाव सदर अर्जदारास देण्यात आलेला आहे. जन्म/मृत्युच्या च्या १ वर्षाच्या आत मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवु शकते. अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत येथे देण्यात आली. अशा परिस्थीती मध्ये सदर अर्जदार यांच्या मुलीची जन्माची नोंद जन्म-मृत्यु नोंदणी रजिस्टरला होणे न्यायाच्या व जरुरीचे आहे त्याकरीता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहून अर्जदाराचे सदरहू जन्म-मृत्यु नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर हया जाहीर नोटीसीच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत दि. /०९/२०२६ पुर्वी त्याने हया कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहून कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास जन्म-मृत्यु नोंद घेणेबाबत आदेश करतील. आज दि. /०८/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे.

शिक्का
सही/-
हुकमावरुन
**तहसिलदार शेवगाव तथा तालुका दंडाधिकारी शेवगाव**

**जाहिर प्रगटन**

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यु/एस/आर/२२९/२०२६
नेवासा दिनांक : २७/०७/२०२६

अर्जदार श्री श्रीम-अमोल सुभाष वाघमारे, रा.माळेवाडी खालसा, नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम./कु. अमोल सुभाष वाघमारे, रा.माळेवाडी खालसा, ता. नेवासा यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.१, जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-अमोल सुभाष वाघमारे, गावाचे नाव-रा.माळेवाडी खालसा, जन्म दिनांक-०३/०७/१९९२

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहसीलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

**- जाहीर इशारा नोटीस-**

आमचे अशिल मधुकर शिवराम भालेराव, वय ७० वर्षे (जेष्ठ नागरीक), धंदा शेती व मजुरी, रा. कौठे, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर यांचेतर्फे तमाम लोकांस विशेषतः मौजे कौठे, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर परिसरातील लोकांना सदर जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, आमचे अशील हे मौजे कौठे, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून शेतीव्यवसाय करतात. आमचे अशीलांचे मालकीचे मौजे कौठे, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर येथील गट नं. ४६ मध्ये शेतजमीन क्षेत्र आहे. सदर गट नं. ४६ चे शेतजमीन ७/१२ सदरी इतर हक्कात आमचे अशीलांचे मुळ पुरुष शिवराम तात्या भालेराव यांचे वारस पत्नी पार्वती तसेच वारस मुली लिलाबाई चांगदेव, सुशिला मोहन, शेवंताबाई मोहन लोंढे, शालन विठ्ठल जगताप व वारस मुले मधुकर व सदाशिव शिवराम भालेराव यांची वारस फेरफार क्र. २७४ प्रमाणे नोंद आहे. सदर गट नं. ४६, ४५ व १९ मध्ये मुळ कब्जेदार तात्या शिवा भालेराव (महार) हे होते. त्यांना मुले बळी तात्या भालेराव व शिवराम तात्या भालेराव हे होते व आहेत व सदर ७/१२ सदरी इतर हक्कात त्यांचे वारस पत्नी व मुलींची, मुलांची नावे आहेत. शिवराम तात्या भालेराव यांना तीन मुले व चार मुली हे वारस होत. त्यापैकी एक आमचे अशील आहेत. सदर गट नं. ४६, ४५ व १९ चे क्षेत्र दुरुस्तीबाबत शिवराम तात्या भालेराव यांचा मुलगा मधुकर शिवराम भालेराव म्हणजेच आमचे अशील यांनी मा. उपसंचालक भूमि अभिलेख, नाशिक प्रदेश, नाशिक यांचे न्यायालयात क्र. एकत्रि/कौठा/श्रीगोंदा/जि.अहिल्यानगर/का.वि.३७/२०२६ E-८३९३०५४/२०२६/E-८६१७८७७ अन्वये प्रकरण/दावा/वाद एकत्रिकरण योजने विरोधात संदर्भात नमुद केल्यानुसार दाखल केला असून त्याबाबतचे कामकाज मा. न्यायालयात सद्यस्थितीत चालू आहे. सदर गटामध्ये चुकीच्या खरेदी व बक्षीसपत्राने नावे लागलेले विक्रम वाल्मिक सोनवणे व प्रशिक राजेंद्र सोनवणे हे त्यांचे नावे असलेले वरील गट नं. ४६ मधील क्षेत्र त्रयस्थ व्यक्तींना विकण्याच्या तयारीत असलेबाबत खात्रीलायक माहिती या आमचे अशील यांना मिळालेली आहे. तरी विक्रम वाल्मिक सोनवणे व प्रशिक राजेंद्र सोनवणे यांनी गट नं. ४६ मधील त्यांचे नावे असणारे क्षेत्राबाबत कोणीही खरेदी, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिन, मुखत्यारपत्र अगर सदर त्यांचे नावे असणारे क्षेत्राचे हस्तांतरण होईल अशा कोणत्याही प्रकारचे लेखी, नोंदणीकृत अगर तोंडी व्यवहार करु नये. केल्यास असा कोणताही व्यवहार हा आमचे अशील तसेच वर नमुद मिळकतींवर बंधनकारक राहणार नाही. तसेच अशा प्रकारचा कोणताही व्यवहार हा बेकायदेशीर असा असेल. असे झाल्यास व्यवहार करणाऱ्यांवर दिवाणी, फौजदारी व अन्य प्रचलीत कायद्यान्वये कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी. कोणाचेही नुकसान होवू नये या उद्देशाने सदरची जाहीर ईशारा नोटीस प्रसिद्ध करण्यात आली आहे. कळावे. ही जाहीर इशारा नोटीस असे.

श्रीगोंदा
दि. २९/०८/२०२६
अशील
मधुकर शिवराम भालेराव

**करीता ॲडव्होकेट यांचे मार्फत प्रसिद्ध**
सही/-
**ॲड. रविंद्र विठ्ठल शितोळे**
रा. श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर
मो.नं. ९६७३३२७३८७

**जाहीर नोटीस**

तहसिल कार्यालय कोपरगांव
क्र. कावि/फौजदारी/१७४/२०२६
कोपरगांव दि. २४/०८/२०२६

कोपरगांव येथील मे. तहसिलदार साहेब यांचे कोर्टात.
जाकिर इब्राहिम शेख, रा. कोपरगांव ता.
कोपरगांव जि. अहिल्यानगर.
विरुध्द
निबंधक जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी तथा
नगरपरिषद कोपरगांव, ता. कोपरगांव, जि. अहिल्यानगर

ज्याअर्थी, अर्जदार जाकिर इब्राहिम शेख रा. कोपरगांव ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर यांचे जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये अर्जदार नामे जाकिर इब्राहिम शेख यांची आई या दिनांक. ०८/०४/१९७५ रोजी मौजे कोपरगांव ता. कोपरगांव येथे प्रसुत होऊन अर्जदार नामे जाकिर इब्राहिम शेख यांचा जन्म झाला आहे. सदर अर्जदार यांचे जन्माची नोंद नगरपरिषद कोपरगांव ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर यांचेकडे अनावधानाने करावयाची राहुन गेली आहे. तथापी अर्जदार यांचे जन्माची नोंद जन्म मृत्यु रजिष्टरला नोंद होण्याकामी तसा मे. कोर्टचा आदेश होण्याकामी चौकशी अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांनी त्यांचे जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये, अर्जदार यांचे जन्म दिनांक ०८/०४/१९७५ रोजी मौजे कोपरगांव ता. कोपरगांव येथे झाला आहे. अर्जदार यांचे जन्माची नोंद नगरपरिषद कोपरगांव ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर, येथे होण्याबाबत कोणाची कोणतीही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्री पुराव्यांसह सदरची हरकत मे. कोर्टासमोर हजर होवून पुराव्यानिशी दाखल करावी. अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही. असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करेल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालनार नाही. याची जाहीर नोंद या जाहीर नाम्याने घेण्यात यावी, कळावे.

आज दि. २४/०८/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानीशी दिले.

शिक्का
**हुकूमावरुन**
**तहसिलदार कोपरगांव**

# कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये अग्निशमन आपत्ती प्रात्यक्षिक सरावाचे आयोजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनच्या कॉलेज ऑफ नर्सिंग, अहिल्यानगर येथे समुदाय आरोग्य परिचर्या विभागाच्या वतीने बी.एस्सी. नर्सिंगच्या विद्यार्थ्यांसाठी अग्निशमन आपत्ती प्रात्यक्षिक सराव आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये अग्निसुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे, तसेच आपत्कालीन परिस्थिती आणि आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या प्रात्यक्षिक सरावामुळे विद्यार्थ्यांना आगीसारख्या आपत्कालीन परिस्थितीत तत्परतेने, प्रभावीपणे आणि सुरक्षितपणे प्रतिसाद देण्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. विद्यार्थ्यांची आपत्कालीन परिस्थितीतील तयारी, आत्मविश्वास आणि व्यावसायिक क्षमता वाढविण्याच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा एक भाग म्हणून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.



आपत्ती किंवा आपत्कालीन परिस्थिती कोणत्याही वेळी उद्भवू शकते. अशा वेळी रुग्णांची सुरक्षितता सुनिश्चित करणे, तातडीने प्राथमिक उपचार देणे, सुरक्षित स्थलांतर करणे, आपत्कालीन पथकांशी समन्वय साधणे आणि आवश्यक वैद्यकीय मदत उपलब्ध करून देणे, यामध्ये परिचारिकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. ही बाब लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञान न देता प्रत्यक्ष कृतीवर आधारित प्रशिक्षण देण्यात आले. प्रात्यक्षिक सरावादरम्यान विद्यार्थ्यांना अग्निसुरक्षेची मूलभूत तत्त्वे, आपत्कालीन प्रतिसाद, सुरक्षित स्थलांतर प्रक्रिया आणि आपत्ती व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. आग लागल्याची माहिती मिळाल्यानंतर तातडीने अलार्म देणे, संबंधित अधिकाऱ्यांना माहिती देणे, नागरिक व रुग्णांचे सुरक्षित स्थलांतर करणे, घाबरून न जाता शांतपणे परिस्थिती हाताळणे आणि बाधित व्यक्तींना तातडीने प्राथमिक उपचार देणे, याबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे प्रशिक्षण देण्यात आले.

या मॉक ड्रिलमध्ये बाधित व्यक्तींना रुग्णवाहिकेद्वारे सुरक्षितपणे रुग्णालयात हलविणे आणि रुग्णालयात आवश्यक आपत्कालीन उपचार उपलब्ध करून देण्याच्या प्रक्रियेचाही समावेश करण्यात आला. सुरुवातीच्या आपत्कालीन प्रतिसादापासून सुरक्षित स्थलांतर, रुग्णवाहिकेद्वारे वाहतूक आणि आपत्कालीन वैद्यकीय उपचारापर्यंतच्या विविध टप्प्यांचा विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत वेळेवर उपचार तसेच विविध विभागांमधील प्रभावी समन्वयाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजले. विद्यार्थ्यांनी या प्रात्यक्षिक सरावात उत्स्फूर्त सहभाग घेत आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित विविध कौशल्यांचे प्रदर्शन केले. या उपक्रमातून संघभावना, प्रभावी संवाद, नेतृत्वगुण, तत्पर निर्णयक्षमता तसेच आरोग्यसेवा कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी आणि सहाय्यक पथकांमधील समन्वयाचे महत्त्व अधोरेखित झाले.

या प्रात्यक्षिकामुळे विद्यार्थ्यांना आपत्कालीन परिस्थितीत स्वतःची तसेच रुग्णांची सुरक्षितता कशी राखावी, संभाव्य धोके कसे ओळखावेत आणि परिस्थितीला नियोजनबद्ध पद्धतीने कसा प्रतिसाद द्यावा, याबाबत आत्मविश्वास मिळाला. सैद्धांतिक ज्ञान आणि प्रत्यक्ष कृती यांच्यातील दुवा निर्माण करण्यासाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला. या अग्निशमन आपत्ती प्रात्यक्षिक सरावाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले. प्रा. डॉ. अभिजित दिवटे, संचालक (वैद्यकीय) यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच डॉ. सतीश मोरे, वैद्यकीय अधीक्षक, डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल; डॉ. मयुरी वाळुंज, कॅज्युअल्टी ऑफिसर (अपघात व आपत्कालीन विभाग अधिकारी) आणि श्री. आंबोरे, सुरक्षा अधिकारी यांचे सहकार्य व मोलाच्या योगदानाबद्दल विशेष आभार व्यक्त करण्यात आले.

**श्रीरामपूर नगरपरिषद, श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर**
जा.क्र.व.शि.आरोग्य/२६-२७/०७६२/१ दि.२७/०८/२०२६

**जाहीर सूचना**

सर्व नागरिक व प्राणिप्रेमीना याद्वारे कळविण्यात येते की. मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल सुमोटो रिट याचिका क्र. ०५/२०२५ (CITY HOUNDED BY STRAYS KIDS PAY PRICE) मधील दिलेल्या निर्देशानुसार व मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्यासाठी श्रीरामपूर नगरपरिषदेमार्फत (ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर) विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. नगरपरिषद क्षेत्रातील भटक्या प्राण्यांमुळे (विशेषतः कुत्र्यांमुळे) नागरिकांना व लहान मुलांना होणारा त्रास, सुरक्षिततेचा प्रश्न आणि रेबीजसारख्या आजारांचा धोका लक्षात घेता, नगरपरिषदेत तक्रार निवारण कक्ष (Grievance Redressal Cell) अधिकृतपणे स्थापन करण्यात आला आहे.

या उपक्रमांतर्गत नगरपरिषदेने १८००२३३२१५५ / ०२४२२-२२२१५४/५५ हा विशेष हेल्पलाइन क्रमांक कार्यान्वित केला आहे. नागरिक कार्यालयीन वेळेत या क्रमांकावर संपर्क साधून भटक्या प्राण्यांच्या हल्ल्यांसंबंधी, उपद्रवाबाबत अथवा इतर कोणत्याही समस्येबाबत आपली तक्रार नोंदवू शकतात. प्राप्त झालेल्या तक्रारींवर त्वरित कारवाई करणे, प्राण्यांचे निर्बीजीकरण (ABC) व लसीकरण मोहीम राबवणे आणि शहरातील बालकांचे तसेच नागरिकांचे संरक्षण करणे हे या कक्षाचे मुख्य उद्दिष्ट आहे. श्रीरामपूर नगरपरिषद क्षेत्रातील नागरिकांनी भटक्या प्राण्यांच्या समस्येबाबत वरील हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

**मनोज उकिर्डे**
**मुख्याधिकारी**
**श्रीरामपूर नगर परिषद, श्रीरामपूर**

**Vijay Ganga Rural Medical & Research Foundation**
At/ P: -Bhalwani, Tal: -Parner, Dist - Ahilyanagar.
Ph. No: -9421556198 Email. Id: - vijayacollegeofnsg23@gmail.com

**Walk-In-Interview**

Walk-in-Interviews for below mentioned post in our **Vijaya College of Nursing, Bhalwani, Tal-Parner, Dist- Ahilyanagar** are arranged on **Monday 07/09/2026, at 11.00am**

| Sr. No. | Post | No. of Post | Essential Qualification | Experience |
|---|---|---|---|---|
| 1 | Professor cum Principal | 01 | M.Sc. Nursing | M.Sc. (Nursing) having total 15 years' experience with M.Sc. (Nursing) out of which 10 years teaching experience after M.Sc. (Nursing) in collegiate program. Ph.D. (Nursing) is desirable |
| 2 | Professor cum Vice - Principal | 01 | M.Sc. Nursing | M.Sc. (Nursing) total 12 years' experience with M.Sc. (Nursing) out of which 10 years teaching experience after M.Sc. (Nursing) in collegiate program. Ph.D. (Nursing) is desirable |
| 3 | Professor | 01 | M.Sc. Nursing | M.Sc. (Nursing) total 12 years' experience with M.Sc. (Nursing) out of which 10 years teaching experience after M.Sc. (Nursing) in collegiate program. Ph.D. (Nursing) is desirable Ph.D. (Nursing) is desirable |
| 4 | Associate Professor | 02 | M.Sc. Nursing | Total 8 years' experience with M.Sc. (Nursing) including 5 years teaching experience out of this 3 year teaching experience after M.Sc. (Nursing) in collegiate program. |
| 5 | Assistant Professor | 03 | M.Sc. Nursing | M.Sc. (Nursing) with total 3 years teaching experience Ph. D. (Nursing) is desirable. |
| 6 | Tutor | 08-16 | M.Sc. Nursing / B. Sc. Nursing | Tutor M. Sc. (Nursing) preferable Experience. B. Sc. (Nursing)/ P. B. B. Sc. (Nursing) with 1 year experience |

Eligible and interested candidates should bring their application along with resume. Attested copies of testimonials, experience certificates, two passport size colour photographs, and all original documents at the time of interview-meanwhile forward the soft copy of resume to email-ID: - vijayacollegeofnsg23@gmail.com two days before the date of interview.

**INTERVIEW VENUE: - Vijaya College of Nursing,**
**At/P - Bhalwani, Tal- Parner, Dist- Ahmednagar**

**Dr. Kiran G. Rohokale**
**President**

## पान १ वरून

पान १ वरून

# कुकडी सहकारी कारखाना जिल्हा बँकेकडून जप्त!

कर्ज घेतले होते. त्याची परतफेड झाली नाही. व्याजासह ही

रक्कम आता ३७० कोटींवर पोचली आहे. त्यामुळे बँकेने त्यांना वारंवार जप्तीच्या नोटिसा बजावल्या होत्या. त्याला मुदतवाढही दिली होती. जिल्हा बँकेचे संचालक मंडळ फेब्रुवारी २०२६ पर्यंत अस्तित्वात होते. संचालक मंडळ असतानाच या नोटीसा बजावल्या गेल्या होत्या. आता संचालक मंडळाची मुदत संपली आहे. बँकेवर प्रशासक म्हणून संगीता डोंगरे यांची नियुक्ती झाली आहे. प्रशासकीय राजवटीत प्रत्यक्ष जप्तीची कारवाई झाली.

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने दि. २७ ऑगस्ट रोजी परिपत्रक काढण्यात आले. त्यानुसार सरफेसी कायद्याची अंतर्गत कारवाई करत कुकडी सहकारी कारखान्यावर बँकेचा ताबा घेत चल-अचल मालमत्तेचा सुपूर्तनामा तसेच सर्व मालमत्तेचा पंचनामा करून मालमत्ता सील करण्यासाठी अधिकाऱ्यांची फौज तैनात करण्यात आली होती. ही कारवाई पोलिस बंदोबस्तात पार पडली.

या कारवाईसाठी बँकेचे प्राधिकृत अधिकारी तथा सरव्यवस्थापक एस. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विभागांतील अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. कारखान्याचे चेअरमन व कार्यकारी संचालक यांच्याशी चर्चा करून कारखान्याची संपूर्ण मिळकत कायदेशीर प्रक्रियेनुसार ताब्यात घेण्याचे निर्देश देण्यात आले. कारवाईदरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी अहिल्यानगर जिल्हा पोलिस अधीक्षक व श्रीगोंदा आणि बेलवंडी पोलिस ठाण्याच्यापोलिस निरीक्षकांशी समन्वय साधून आवश्यकतेनुसार पोलिस मदत घेण्याचेही नियोजन करण्यात आले होते.

कारखान्याची चल व अचल मालमत्ता ताब्यात घेताना प्रत्येक बाबीची कायदेशीर पूर्तता करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मालमत्तेचा पंचनामा करून सुपूर्तनामा तयार करण्यात आले असून, त्यावर पंचांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या आहेत. संपूर्ण प्रक्रियेचे फोटोग्राफी व व्हिडिओ शूटिंग करून दस्तऐवजीकरण करण्याचीही व्यवस्था करण्यात आली होती. ताबा घेतल्यानंतर कारखान्याच्या संपूर्ण मालमत्तेची प्रत्यक्ष पाहणी करून ती सील करण्याचे तसेच संबंधित नोटिसा व बोर्ड लावण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आवश्यकतेनुसार मालमत्तेची मोजदाद करण्याचाही उल्लेख आदेशात करण्यात आला आहे.

कारखान्याची संपूर्ण मालमत्ता ताब्यात घेतल्यानंतर तिच्या देखरेखीसाठी सुरक्षा रक्षक अथवा गनमेन नियुक्त करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. कारवाईसाठी आवश्यक असलेले सील, नोटिसा, फोटोग्राफी-व्हिडिओ शूटिंगची साधने तसेच इतर साहित्याची स्वतंत्र व्यवस्था करण्याचे आदेश संबंधित विभागांना देण्यात आले आहेत. तालुका विकास अधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी तसेच संबंधित शाखेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या कारवाईत पूर्ण सहकार्य करावे, असे निर्देशही देण्यात आले आहेत.

कारवाईदरम्यान कोणतीही अडचण अथवा अनपेक्षित परिस्थिती निर्माण झाल्यास प्राधिकृत अधिकाऱ्यांना तत्काळ अवगत करून त्यांच्या मार्गदर्शनानुसार आवश्यक निर्णय घेण्याचे आदेश देण्यात आले होते. कारवाईत सहभागी होणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना बँकेचे ओळखपत्र जवळ बाळगण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

कुकडी सहकारी कारखान्याच्या मालमत्तेवर सरफेसी कायद्याचे अंतर्गत ताबा घेण्याच्या या हालचालीमुळे श्रीगोंदा तालुक्यात खळबळ उडाली आहे. कारखान्याचे पुढील भवितव्य, कामगारांचे हित, शेतकरी सभासदांचे प्रश्न आणि आर्थिक व्यवहार याबाबत आता विविध चर्चांना उधाण आले असून, प्रत्यक्ष कारवाईनंतर या प्रकरणाला आणखी निर्णायक वळण मिळण्याची शक्यता आहे.दस्तऐवजात कारखान्याची चल व अचल मालमत्ता ताब्यात घेणे, पंचनामा-सुपूर्तनामा करणे, मालमत्ता सील करणे आणि आवश्यकतेनुसार पोलिस मदत घेण्याच्या सूचना परिपत्रकात नमूद आहेत.

# बाळासाहेब थोरात यांच्या प्रयत्नांतून महादेव देवस्थानांसह तीर्थक्षेत्रांचा विकास : आ. सत्यजित तांबे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनातून संगमनेर तालुका विकासाच्या वाटेवर अग्रेसर झाला असून, विकासकामांसोबतच तालुक्यातील देवस्थाने व तीर्थक्षेत्रांच्या विकासालाही मोठी चालना मिळाली आहे. विविध देवस्थानांना निधी उपलब्ध करून देत मंदिरांचे सुशोभीकरण, सभामंडप व भाविकांसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. त्यामुळे संगमनेर तालुका हे अध्यात्माचे मोठे केंद्र बनले असल्याचे प्रतिपादन आ. सत्यजित तांबे यांनी केले.

श्रावणातील तिसऱ्या सोमवारी खांडगाव येथील खंडेश्वर व बुद्रुक येथील रामेश्वर मंदिरात आ. तांबे यांनी दर्शन घेऊन पूजा केली. यावेळी त्यांनी खांडगाव येथे स्वतः खिचडी तयार करून भाविकांना प्रसादाचे वाटप केले. भाविकांशी संवाद साधत त्यांनी त्यांच्या सुविधांचीही आस्थेने चौकशी केली.

आ. तांबे म्हणाले की, सुमारे ११० किलोमीटर लांबीच्या संगमनेर तालुक्यात पठार, प्रवरा पट्टा व तळेगाव असे भौगोलिक विभाग आहेत. कृषी, सहकार, शिक्षण, बाजारपेठ व पायाभूत सुविधांसोबतच अध्यात्मिक व सांस्कृतिक क्षेत्रालाही बाळासाहेब थोरात यांनी चालना दिली आहे. खांडेश्वर, बाळेश्वर, रामेश्वर, निझरनेश्वर, दुधेश्वर व अमृतेश्वर या देवस्थानांचा विकास करण्यात आला असून, पर्यटन विभागाच्या माध्यमातून विविध देवस्थानांना दर्जा मिळवून देण्यात आला आहे. यापुढेही तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नसल्याची ग्वाही त्यांनी दिली.

दरम्यान, तिसऱ्या सोमवारी खंडेश्वर, निझरनेश्वर, रामेश्वर, अमृतेश्वर व दुधेश्वर मंदिरांमध्ये भाविकांची मोठी गर्दी झाली. रामेश्वर देवस्थानासाठी मुकुटाचे अर्पणही आ. तांबे यांच्या हस्ते करण्यात आले.



# साई निर्माण ग्रुपच्या '१२ ज्योतिर्लिंग संकल्प पूर्ती यात्रा'चे बनारस नगरीत स्वागत

**अशोक दुशिंग । राष्ट्र सह्याद्री**

**वाराणसी :** साई निर्माण ग्रुपच्या वतीने आयोजित बहुचर्चित '१२ ज्योतिर्लिंग संकल्प पूर्ती यात्रा' ३१ ऑगस्ट रोजी पवित्र बनारस (काशी) नगरीत मोठ्या जल्लोषात आणि भक्तिमय वातावरणात दाखल झाली. या धार्मिक सोहळ्यामुळे संपूर्ण काशी नगरी काही काळासाठी 'साईमय' झाल्याचे पाहायला मिळाले. हजारो साई भक्तांच्या उपस्थितीत रंगलेल्या या सोहळ्याने बनारसच्या अध्यात्मिक वातावरणात एक वेगळाच उत्साह निर्माण केला.

यात्रा काशी नगरीत पोहोचताच स्थानिक साई भक्त राजेश अरोरा आणि इतर प्रमुख मान्यवरांच्या हस्ते साई पालखीची अत्यंत विधिवत महाआरती करण्यात आली. या महाआरतीच्या वेळी संपूर्ण परिसर मंत्रोच्चार आणि भक्तीच्या वातावरणात दुमदुमून गेला होता. आरतीनंतर ढोल-ताशांचा दणदणाट, बँड पथकाची सुरावटी आणि 'ओम साई नमो नमः जय जय साई नमो नमः' तसेच 'हर हर महादेव' च्या अखंड जयघोषात एक भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या पालखी सोहळ्यात हजारो साई भक्त उत्साहाने सहभागी झाले होते. ढोल-ताशांच्या तालावर नाचत भक्तांनी यात्रेचा आनंद द्विगुणित केला. शोभायात्रा निघून श्री काशी विश्वनाथ मंदिराकडे मार्गस्थ झाली. संपूर्ण काशी विश्वनाथ कॉरिडॉर साई भक्तांच्या अफाट गर्दीने फुलून गेला होता. यात्रेत सहभागी



झालेल्या सर्व भाविकांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने आराध्य दैवत श्री काशी विश्वनाथाचे दर्शन घेतले. बाबांच्या व महादेवाच्या जयघोषाने संपूर्ण परिसर निनादला होता. हा सोहळा केवळ एक धार्मिक यात्रा न राहता, भक्ती, संस्कृती आणि शिस्तीचा एक अद्वितीय संगम ठरला, ज्याची गोड आठवण बनारसवासी आणि शिर्डीकरांच्या मनात कायम राहील.

# लोकसहभागातून चिंताहरण महादेव मंदिर परिसराचा कायापालट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार :** राहाता तालुक्यातील आडगाव बु. येथील गावापासून दूर, निसर्गरम्य वातावरणात वसलेले जागृत देवस्थान श्री चिंताहरण महादेव मंदिर परिसराचा गेल्या दोन वर्षांत ग्रामस्थांच्या लोकसहभागातून कायापालट झाला आहे. विविध विकासकामे व सुशोभीकरणामुळे हे मंदिर श्रावण महिन्यात पंचक्रोशीतील शिवभक्तांसाठी श्रद्धेचे व आध्यात्मिक केंद्र ठरले आहे. श्रावणातील प्रत्येक सोमवारी मंदिरात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे. पंचक्रोशीतील वाड्या-वस्त्यांमधून महिला व शिवभक्त पायी चालत मंदिरात येऊन महादेवाचे दर्शन घेत आहेत. सामाजिक कार्यकर्ते प्रविण रामदास शेळके, ग्रामस्थ तसेच गावातील तरुण मंडळांच्या सहभागातून सप्ताहापूर्वी मंदिर परिसरात आकर्षक व निसर्गरम्य 'महादेव गार्डन'ची निर्मिती करण्यात आली. याशिवाय मंदिराची रंगरंगोटी, स्टेजची उभारणी, दुरुस्तीची कामे आणि परिसराचे सुशोभीकरण करण्यात आल्याने मंदिर परिसराला नवे रूप प्राप्त झाले आहे. दरम्यान, १ सप्टेंबरपासून मंदिर परिसरात ३९ वा अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांनी कीर्तन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन चिंताहरण महादेव भक्त मंडळ व पंचक्रोशीच्या वतीने करण्यात आले आहे.

# भर दिवसा घरात घुसून सासू सुनेला मारहाण करून लुटले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** दिवसा घरात घुसलेल्या चोरांनी सासू-सुनेला बेदम मारहाण करून दागिने व रोकड लुटल्याची माहिती मिळाली आणि वैजापूर पोलिसांची यंत्रणा कामाला लागली. गंभीर जखमी ७० वर्षीय सासूला रुग्णालयात दाखल करण्यात आले, तर तिची ३५ वर्षीय सूनही हातावर नखांचे ओरखडे असल्याने उपचारासाठी दाखल झाली. सुरुवातीला समोर आलेले चित्र धक्कादायक होते. मात्र, उपचारादरम्यान सासूने पोलिसांना दिलेल्या जबाबाने या कथित लुटीच्या प्रकरणाला अचानक वेगळेच वळण मिळाले.

सोमवारी सकाळी सुमारे दहा वाजता ही घटना घडल्याचे सांगण्यात आले. दोन अनोळखी व्यक्तींनी घरात प्रवेश केला. त्यांनी आपल्याला व सासूला मारहाण केली आणि दागिने व रोख रक्कम घेऊन पसार झाल्याचे सुनेने सांगितले. वृद्ध महिलेची प्रकृती गंभीर असल्याने तिला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. दिवसा घरात घुसून वृद्ध महिलेला मारहाण करून लूट झाल्याची माहिती मिळताच वैजापूर पोलिसांनी प्रकरण गांभीर्याने घेत तपास सुरू केला. वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनीही या घटनेची माहिती घेत घटनाक्रम पडताळण्यास सुरुवात केली. मात्र, रुग्णालयात उपचार घेत असलेल्या वृद्ध महिलेने पोलिसांना दिलेल्या जबाबामुळे तपासाची दिशाच बदलली. 'घरात चोर आले नव्हते', असा दावा वृद्धेने केला. आपल्याला सुनेनेच मारहाण केल्याचे तिने पोलिसांना सांगितले. मारहाणीमागील कारणाबाबतही तिने पोलिसांना माहिती दिली असून त्याची सत्यता तपासली जात आहे. वृद्धेचा जबाब पोलिसांनी व्हिडिओ रेकॉर्डिंगद्वारे नोंदवून घेतला आहे. त्यामुळे सुरुवातीला सांगण्यात आलेल्या चोरीच्या घटनेमागे नेमके काय दडले आहे, याचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर उभे ठाकले आहे. हा प्रकार प्रत्यक्षात चोरीचा होता की कौटुंबिक वादातून घडलेल्या मारहाणीला चोरीचे स्वरूप देण्यात आले, याचा तपास आता पोलिसांकडून केला जात आहे. दरम्यान, मारहाणीत वृद्ध महिलेची प्रकृती गंभीर असून तिच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांकडून सासू-सुनेचे जबाब, त्यांच्या शरीरावरील जखमा, घटनास्थळ तसेच चोरीला गेलेल्या वस्तूंबाबतची माहिती यांची पडताळणी केली जात आहे. तपासातूनच या प्रकरणातील नेमके सत्य समोर येणार आहे.

# विषारी औषध प्राशन केल्याने तरुणाचा मृत्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** विषारी औषध प्राशन केल्याने एका २२ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी समोर आली आहे. तेजस सुनील उगले, वय २२ वर्षे, रा. बोरदहेगाव, असे मयत तरुणाचे नाव आहे.

नातेवाईकांकडून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, तेजस हा दुपारी शेतात काम करण्यासाठी गेला होता. बराच वेळ होऊनही तो घरी परत न आल्याने नातेवाईकांनी शेतात जाऊन पाहिले असता, तो बेशुद्ध अवस्थेत पडलेला आढळून आला.



त्याला तातडीने वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात सायंकाळी ८ वाजेच्या सुमारास दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून त्याला मृत घोषित केले.याबाबत वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीवरून वैजापूर पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# श्रीरामपूर मतदारसंघाची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

## ३०,७७४ मतदार वगळले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** २२० श्रीरामपूर (अ.जा.) विधानसभा मतदारसंघातील विशेष सखोल पुनरिक्षण (एस.आय.आर.) अंतर्गत पहिल्या टप्प्यातील मतदार पडताळणीचे काम पूर्ण झाले असून, दि. ३१ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली. या प्रक्रियेत मतदारसंघातील एकूण ३०,७७४ मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. एस.आय.आर.पूर्वी श्रीरामपूर मतदारसंघात एकूण ३ लाख ५ हजार ४९७ मतदार होते. प्रारूप मतदार यादीत आता २ लाख ७४ हजार ७२३ मतदारांचा समावेश करण्यात आला आहे. वगळण्यात आलेल्या मतदारांमध्ये १० हजार २०८ मयत, ४ हजार ३८३ अनुपस्थित, ११ हजार ९४७ कायमस्वरूपी स्थलांतरित, ४ हजार १७२ दुबार नोंदी, तर ६४ इतर मतदारांचा समावेश आहे.

प्रारूप मतदार यादी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, श्रीरामपूर व देवळाली प्रवरा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, सर्व तलाठी कार्यालये तसेच मतदान केंद्रांवरील बीएलओ यांच्याकडे पाहणीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. १ ऑक्टोबर २०२६ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या पात्र नागरिकांना मतदार यादीत नाव नोंदविण्यासाठी नमुना ६ भरता येणार आहे. नाव वगळण्यासाठी नमुना ७, तर नाव अथवा इतर तपशीलात दुरुस्तीसाठी नमुना ८ भरता येईल. दावे व हरकती ३० सप्टेंबरपर्यंत दाखल करता येणार आहेत. प्रारूप यादीतून चुकून नाव वगळले असल्यास संबंधितांनी नमुना ६ भरून नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यासंदर्भात अडचण अथवा शंका असल्यास निवडणूक शाखेत स्थापन करण्यात आलेल्या मतदार सहायता कक्षाशी संपर्क साधता येणार असल्याची माहिती प्रांताधिकारी किरण सावंत पाटील व तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांनी दिली.

**मतदारांनी यादी तपासावी**

**दावे-हरकती : ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत**
**दावे-हरकतींचे निराकरण : २९ ऑक्टोबर २०२६ पर्यंत**
**अंतिम मतदार यादी : ४ नोव्हेंबर २०२६**
**मतदार यादी पाहण्यासाठी : मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्या वेबसाइटवर तसेच भारत निवडणूक आयोगाच्या मतदार सेवा संकेतस्थळावर नाव तपासता येईल.**

**मतदारांनी आपले नाव तपासावे**

**काल प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाली आहे. दावे व हरकती ३० सप्टेंबरपर्यंत दाखल करता येतील. अंतिम मतदार यादी ४ नोव्हेंबरला प्रसिद्ध होणार आहे. त्यामुळे मतदारांनी आपले नाव यादीत आहे की नाही, याची खात्री करून घ्यावी.**



**- किरण सावंत पाटील, प्रांताधिकारी, श्रीरामपूर**

## निधन

### नारायणराव व्यवहारे



**श्रीरामपूर :** जिल्हा परिषद श्रीरामपूर येथील माजी कर्मचारी नारायणराव रामभाऊ व्यवहारे (वय ८४) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचे मागे दोन मुले, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे विजय व अरुण यांचे ते वडील होत.

### केशरबाई चौधरी



**चांदा :** येथील केशरबाई गणपत चौधरी यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पाच मुले, सुना, नातवंडे, परतवंडे असा परिवार आहे.

### माणिकचंद गांधी



**श्रीरामपूर :** येथील जैन समाजातील जेष्ठ धार्मिक व किराणा व्यावसायिक (रा. जर्मन हॉस्पिटलजवळ) माणिकचंद मोतीलाल गांधी (वय ६७) यांचे सोमवार, दि. ३१ ऑगस्ट रोजी संथारा व'तात निर्वाण झाले. त्यांच्या पश्चात १ भाऊ, १ मुलगा, १ मुलगी, सुन, पुतणे, जावई व नातवंडे असा परिवार आहे. ते रमणलाल गांधी यांचे धाकटे बंधु व ॲड. मयुर गांधी यांचे वडील व रोहित, नयन गांधी यांचे ते चुलते होत.

# अवैध वाहतूक करणाऱ्या दोन वाहनांवर कारवाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** अवैध रित्या वाळू वाहतूक करणाऱ्या दोन वाहनावर वैजापूर पोलिसांच्या पथकाने कारवाई केली.पहिल्या प्रकरणात पोलिस कॉन्स्टेबल अजित नाचण यांनी फिर्याद दिली आहे त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार सोमवारी रात्री पावणेएक वाजेच्या सुमारास जांबरगाव शिवारात अवैध वाळू वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळाली माहितीच्या अनुषंगाने समृद्धी महामार्गाच्या पुलाखाली विना क्रमांकाचा आयशर टिप्परची थांबवून पथकाने तपासणी केली असता त्यामध्ये दोन ब्रास वाळूची चोरटी वाहतूक करत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले प्रकरणात पोलिसांनी दोन ब्रास वाळू व टिप्पर असा १५ लाख १८ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला. प्रकरणात चालक अविनाश राजेंद्र मोरे वय २३ वर्षे राहणार खंबाळा याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दुसऱ्या कारवाई मध्ये प्रल्हाद जटाळे यांनी फिर्याद दाखल केली आहे त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार सोमवार ता ३१ रोजी रात्री सव्वा एक वाजेच्या सुमारास जांबरगाव शिवारात दत्तू पोपट प्रधान वय २६ वर्षे २६ वर्षे राहणार बिलोणी हा विनाक्रमांकाच्या टिप्पर मध्ये विनापरवाना वाळूची चोरटी वाहतूक करताना आढळून आला.त्याच्या ताब्यातून वाहन व २ ब्रास वाळू असा १५ लाख १८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.अधिक तपास पोलिस करीत आहे.

# 'देवासाठी एकत्र या'; उक्कलगाव ग्रामस्थांची एकमुखी हाक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**उक्कलगाव :** श्रीरामपूर तालुक्यातील उक्कलगाव येथील श्री हरिहर केशव गोविंद भगवान मंदिराच्या कळसाचे नूतनीकरण, मंदिर दुरुस्ती तसेच विविध विकासकामे मार्गी लावण्यासाठी दोन्ही विश्वस्त मंडळांनी सर्व मतभेद बाजूला ठेवून 'देवासाठी एकत्र यावे', अशी एकमुखी साद ग्रामस्थांनी घातली. मंदिराच्या विकासासाठी भाविकांच्या श्रद्धा व भावना लक्षात घेऊन ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी सकाळी नियोजन बैठक घेण्यात आली. बैठकीस अशोक सहकारी साखर कारखान्याचे ज्येष्ठ संचालक रावसाहेब हरी पाटील थोरात, माजी सभापती आबासाहेब थोरात, सरपंच रविना शिंदे, उपसरपंच नितीन थोरात, ग्रामपंचायत सदस्य ॲड. पुरुषोत्तम थोरात यांच्यासह ग्रामस्थ, तरुण मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंदिराच्या कारभारावरून तसेच आर्थिक हिशोबावरून बैठकीत सविस्तर चर्चा झाली. काही मुद्द्यांवरून उपस्थितांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरीही झडल्या. गेल्या पंधरा दिवसांपासून सोशल मीडियावर मंदिराच्या विषयावर विविध चर्चा सुरू असल्याने गावातील वातावरणही



काहीसे तापले होते. त्यामुळे मंदिराच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र येऊन सकारात्मक भूमिका घेण्याची गरज ग्रामस्थांनी व्यक्त केली.

विश्वस्त रविंद्र जगधने यांनी मंदिराच्या उत्पन्नाचा तंतोतंत हिशोब व पूर्ण खर्चाचा ताळेबंद तयार असून, त्यात कोणतीही तफावत नसल्याचे स्पष्ट केले. मंदिराच्या उत्पन्नातून कळसाचे काम पूर्ण करण्याची आपली इच्छा मागील महिन्यापासूनच असल्याचे त्यांनी सांगितले. मंदिरासाठी स्वतंत्र मोठा उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध नसून, मंदिर व शेतातील नियोजित कामांसाठी उपलब्ध निधीतूनच खर्च केला जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. विश्वस्त शरद दत्तात्रय थोरात यांनी आपल्या विश्वस्त मंडळाच्या काळातील पूर्वीचा लेखाजोखा उपलब्ध नसल्याचे सांगितले. उपसरपंच नितीन थोरात यांनी मागील सहा महिन्यांपूर्वी करण्यात आलेल्या नियोजनाचे काय झाले आणि त्यात नेमका अडथळा कोणी आणला, याबाबत उघडपणे चर्चा होणे गरजेचे असल्याची आक्रमक भूमिका मांडली. मागील बैठका कोणत्या कारणांमुळे रद्द झाल्या, यावर चर्चा करत बसण्यापेक्षा मंदिराचे काम सुरळीतपणे कसे पूर्ण करता येईल, याला प्राधान्य द्यावे, असे आवाहन ॲड. पुरुषोत्तम थोरात यांनी केले. मंदिराच्या विकासकामांसाठी आपला पूर्ण पाठिंबा राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. या, बैठकीत काही मुद्द्यांवर मतभेद दिसून आले असले, तरी देवाचे काम मार्गी लावण्यासाठी सर्वजण आग्रही आहेत. आता या विषयावर आगामी चौथ्या सोमवारी पुन्हा एकदा नियोजन बैठक पार पडणार असून, त्या बैठकीत काय ठोस निर्णय होतात? आणि दोन्ही विश्वस्त मंडळे एकत्र येतात का, याकडे संपूर्ण उक्कलगावच्या ग्रामस्थांच्या नजरा लागल्या आहेत. यावेळी, रविंद्र थोरात,आदिनाथ जगधने,युवराज थोरात, सागर चव्हाण, अमित भगत, धनंजय थोरात, प्रकाश थोरात, अशोक शिंदे, आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते.

**चारच विश्वस्तांची उपस्थिती**

**एकूण १५ विश्वस्तांपैकी या महत्त्वपूर्ण बैठकीला फक्त चार विश्वस्त हजर होते. यामध्ये उल्हास महाराज तांबे, रविंद्र जगधने, शरद थोरात आणि जालिंदर थोरात यांचा समावेश होता. उर्वरित विश्वस्तांनी या बैठकीला पाठ फिरवल्याने अनुपस्थित राहिल्याबद्दल ग्रामस्थांमध्ये चर्चा सुरू होती.**

# जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रामाणिकपणे काम करणार : आ. प्राजक्त तनपुरे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी,** विधान परिषदेवर बिनविरोध निवड झाल्याबद्दल आमदार प्राजक्त तनपुरे यांचा शुक्रवारी राहुरी शहरातील व्यंकटेश मंगल कार्यालयात सत्कार करण्यात आला. कांता शेठ व मुन्ना शेठ तनपुरे मित्र मंडळ, युवा मंच, तिळेश्वर प्रतिष्ठान व व्यापारी वर्गाच्या वतीने आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ना. म. साठे सर होते. यावेळी तनपुरे म्हणाले, विधान परिषदेत काम करण्याची पुन्हा संधी दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, सभापती राम शिंदे यांच्यासह सर्वांचे आभार मानतो. मिळालेल्या जबाबदारीचा उपयोग जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी करणार आहे. शनिशिंगणापूर रेल्वेमार्गाला शेतकऱ्यांचा मोठा विरोध असून, त्यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी लक्षात घेता हा मार्ग रद्द करण्यासाठी विधान परिषदेत आवाज उठवून शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.यावेळी व्यासपीठावर राहुरी नगर परिषदेचे नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, उपनगराध्यक्ष गजानन सातभाई, तांदुळवाडीचे सरपंच विराज धसाळ, ताराचंद तनपुरे, पत्रकार सुनील भुजाडी, ना. म. साठे, ॲड अशोक तनपुरे आदी उपस्थित होते. कांता तनपुरे म्हणाले, येथे उपस्थित असलेले सर्वजण हाडाचे कार्यकर्ते आहेत. अडचणीच्या काळात हीच मंडळी खांद्याला खांदा लावून उभी राहिली. प्राजक्त दादांचे आमदार म्हणून निवडून येणे ही राहुरीकरांसाठी अभिमानाची बाब आहे. यावेळी कांता तनपुरे, संतोष लोढा, संजीव उदावंत, भाऊसाहेब बिडवे, दाते सर, विराज धसाळ, सुनील भुजाडी आदींनी मनोगत व्यक्त केले. या सत्कार सोहळ्यास भारत भुजाडी, अनिल कासार, सूर्यकांत भुजाडी, नगरसेवक बबन गुलदगड, नगरसेवक डॉ. संतोष उदावंत, चंद्रकांत पानसंबळ, संतोष लोढा, विलास तरकसे, प्रशांत डौले, ॲड. अशोक तनपुरे, दत्तात्रय येवले, संजय उदावंत, अनिल भट्टड यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, नागरिक, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुन्ना तनपुरे, प्रवीण शिरसाट, संदीप गागरे, किशोर राऊत, शरद शेंडे, मनोज मस्के, विशाल शेजुळ, प्रीतम देशमुख, विवेक सगळगिळे, विजय करपे, सचिन उदावंत यांच्यासह युवा मंच, तिळेश्वर प्रतिष्ठान व व्यापारी वर्गातील कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

**मंगळवार दि. ०१ सप्टेंबर २०२६**

### मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १६०<br>१७९<br>११५ | ७-४ | १५८<br>२४८<br>२२० | जोड<br>१७-७०-६४-<br>४५-६२-२९ |

### कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १२०<br>३४६<br>३३७ | ३-० | १९०<br>२८०<br>४६० | जोड<br>७३-३२-४०-<br>०६-८१-१९ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १४९<br>२३९<br>१९० | ४-६ | १६९<br>२६८<br>६५० | जोड<br>१४-४३-२६-<br>६८-०७-७९ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

# घनकचरा विभागातील मनुष्यबळाचे नियोजन संशयाच्या भोवऱ्यात?

## महापालिकेचे कर्मचारी इतर विभागांत, कचरा संकलन मात्र खासगी ठेकेदारांकडे!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाशी संबंधित मनुष्यबळात वारसाहक्क व अनुकंपा तत्त्वावरील नियुयांमुळे वाढ होत असताना, या कर्मचाऱ्यांच्या वेतनावर महानगरपालिकेच्या तिजोरीतून मोठ्या प्रमाणात खर्च केला जात आहे. मात्र, दुसरीकडे शहरातील कचरा संकलनाचे काम खासगी ठेकेदारामार्फत करून घेण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च सुरूच आहे. त्यामुळे महानगरपालिकेकडे कर्मचारी उपलब्ध असताना कचरा संकलनासाठी खासगी ठेकेदाराची आवश्यकता नेमकी का आहे, असा गंभीर प्रश्न कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत, अहिल्यानगरचे जिल्हा समन्वयक विकास भाऊसाहेब उडानशिवे यांनी उपस्थित केला आहे.

घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी नियुक्त अथवा उपलब्ध झालेल्या वारसाहक्क व अनुकंपा तत्त्वावरील काही कर्मचाऱ्यांना प्रत्यक्षात बांधकाम विभाग तसेच पाणीपुरवठा विभागात कामासाठी पाठविले जात असल्याची माहिती समोर येत असल्याचा दावा उडानशिवे यांनी केला आहे. त्यामुळे घनकचरा व्यवस्थापनासाठी उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाचा नेमका वापर कुठे आणि कशासाठी केला जात आहे, याबाबत महानगरपालिकेने पारदर्शकपणे माहिती जाहीर करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.



महानगरपालिकेच्या सेवेत कर्मचारी संख्या वाढत असताना त्यांच्या वेतनासाठी सार्वजनिक निधीतून खर्च होत आहे. मात्र, त्याचवेळी शहरातील कचरा संकलनासाठी खासगी ठेकेदाराला स्वतंत्रपणे कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जात असल्यास ही दुहेरी आर्थिक व्यवस्था का निर्माण झाली आहे, याचा खुलासा प्रशासनाने करणे गरजेचे आहे. जर घनकचरा व्यवस्थापन विभागाशी संबंधित कर्मचारी इतर विभागांमध्ये कार्यरत केले जात असतील, तर त्यानंतर घनकचरा व्यवस्थापन विभागात मनुष्यबळाची कमतरता निर्माण होत असल्याचे कारण पुढे करून खासगी ठेकेदारामार्फत कचरा संकलन सुरू ठेवले जात आहे का, असा प्रश्नही उडानशिवे यांनी उपस्थित केला आहे.

महानगरपालिकेने उपलब्ध मनुष्यबळाचे योग्य नियोजन करून त्यांचा त्यांच्या मूळ कामासाठी वापर करणे आवश्यक आहे. कर्मचारी उपलब्ध असताना त्यांना इतर विभागांत पाठवून त्याच कामासाठी बाह्य यंत्रणेला कोट्यवधी रुपयांचा ठेका देणे योग्य आहे का, याचा आर्थिक तसेच प्रशासकीय पातळीवर पुनर्विचार करण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे. विकास उडानशिवे यांनी महानगरपालिका प्रशासनासमोर अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. वारसाहक्क व अनुकंपा तत्त्वावर आतापर्यंत एकूण किती कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे, त्यापैकी किती कर्मचारी घनकचरा व्यवस्थापनाशी संबंधित आहेत, तसेच त्यापैकी किती कर्मचाऱ्यांना बांधकाम विभाग आणि किती कर्मचाऱ्यांना पाणीपुरवठा विभागात पाठविण्यात आले आहे, याची माहिती जाहीर करण्याची मागणी त्यांनी केली आहे. तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागात सध्या प्रत्यक्ष कचरा संकलनाच्या कामासाठी किती महानगरपालिका कर्मचारी उपलब्ध आहेत, या कर्मचाऱ्यांच्या वेतनावर दरवर्षी किती खर्च होतो आणि खासगी कचरा संकलन ठेकेदारावर दरवर्षी किती रक्कम खर्च केली जाते, याचा संपूर्ण तपशील नागरिकांसमोर ठेवावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

## द • ख • ल

### कर्जमाफीत बसणाऱ्या शेतकऱ्यांचे व्याज बँकेने घेऊ नये : ढमढेरे



**हातगाव :** राज्यातील शेतकऱ्याकडे विविध बँकेसह सेवा संस्थेचे असणारे कर्ज शासनाने ज्या - ज्या वेळी वेग - वेगळ्या योजनेच्या माध्यमातून माफ केले आहे. त्या - त्या वेळी कर्ज पुरवठा करणाऱ्या बँकांना व सेवा संस्थांना त्या कर्ज खात्याच्या रकमा शेतकऱ्यांच्या खात्यात उशिराने जमा होत असल्यामुळे व तो पर्यंत सर्वच बँका शेतकऱ्यांचे व्याज जमा करून घेत असल्याने याच मुद्द्यावर ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या हितासाठी स्थापन केलेल्या सेवा संस्था आज रोजी तोट्यात येत असून या विषयासाठी शासनस्तरावरून आदेश असतानाही त्याचे पालन होत नसल्याबाबतचे निवेदन शेवगाव तालुक्यातील मुंगी सेवा संस्थेचे माजी अध्यक्ष राजेंद्र ढमढेरे यांनी जिल्हा सहकारी बँकेच्या प्रशासकांना देऊन त्यांचे लक्ष वेधले आहे.या बाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सध्या शासनस्तरावरून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने कर्जमाफी योजना सुरू असून या कर्जमाफी योजनेत जे शेतकरी पात्र झालेले आहेत त्यांच्या कर्जमाफीच्या रकमा त्यांच्या खात्यात शासनाकडून विलंबाने जमा होत आहेत. त्यामुळे त्यासाठी काही कालावधी लागत असून या कालावधीच्या काळातील शेतकऱ्यांकडील कर्जावरील व्याज मात्र बँकेकडून घेतले जात असल्यामुळे ते व्याज नविलाजाने संस्थेला भुर्दंड देणारे ठरत असल्यामुळे ग्रामीण भागातील सेवा संस्था तोट्यात येत असल्याचेही ढमढेरे त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

### माळेगाव ने येथे अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय वातावरणात सांगता



**एरंडगाव :** माळेगाव ने, ता. शेवगाव येथील स्वयंभू महादेव-पार्वती मंदिरात आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता ह.भ.प. महंत पांडुरंग महाराज झुंबड यांच्या काल्याच्या कीर्तनाने भक्तिमय वातावरणात झाली. यावेळी ह.भ.प. महंत पांडुरंग महाराज झुंबड यांनी संत तुकाराम महाराजांचा 'आता हेचि जेऊ सवे घेऊ शिदोरी' हा अभंग निरूपणासाठी घेत भक्तांना आध्यात्मिक संदेश दिला. तालुक्यामध्ये जो माझ्या विचाराने वागला, त्यांनी मिळालेल्या संधीचे सोने केले. महादेव शिव त्यांचे कल्याण करो, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. ज्ञानाचे दैवत शिवशंकर असून पृथ्वीवरील प्रत्येक माणसाला एकमेकांशी जोडण्याचा संदेश भगवान महादेवाने दिला आहे. संत-महात्म्यांनी हा आध्यात्मिक प्रसाद सर्वांसाठी खुला केला आहे. परमात्म्याने दिलेल्या या जीवनरूपी प्रसादाचा आनंद आणि नामस्मरणाचे 'भोजन' आपण सर्वांनी घेतले पाहिजे, असेही महंत पांडुरंग महाराज झुंबड यांनी सांगितले. यावेळी देवस्थान अध्यक्ष बाबासाहेब वाकडे, कृष्णा ढोरकुले, बाळासाहेब मडके, संदीप मस्के, जगन्नाथ गावडे, संजय घुगे, माऊली घनवट, गणेश गर्जे ,गणेश गावडे, तात्या घुले, माणिकराव पाबळे, सोमा मोहिते, संचित गावडे, यांच्यासह भाविक भक्त उपस्थित होते.

### श्रीगोंद्यात एमआयडीसीच्या अतिक्रमणावर आता कारवाईची प्रतीक्षा?

**बेलवंडी :** श्रीगोंदा तालुक्यातील पार्वतवाडी व पिसोरे बुद्रुक परिसरातील प्रस्तावित एमआयडीसीच्या तब्बल २५२ हेक्टर ४३ आर अर्थात सुमारे ६२४ एकर शासकीय जमिनीपैकी जवळपास १०० एकर क्षेत्रावर खासगी शेती सुरू असल्याचा मुद्दा सलग दोन दिवसांच्या वृत्तानंतर चर्चेत आला आहे. या प्रकरणाची दखल घेत एमआयडीसीचे मुख्य प्रशासकीय अधिकारी गणेश राठोड यांनी चौकशी व कायदेशीर कारवाईचे आदेश दिल्याने आता प्रशासनाच्या प्रत्यक्ष कारवाईकडे परिसराचे लक्ष लागले आहे. गेल्या दोन वर्षांपासून जमीन एमआयडीसीच्या ताब्यात असल्याचे सांगितले जात असताना त्याच जमिनीवर ऊस, डाळिंब, पपई, मका,यांसह विविध पिके उभी राहिल्याचे निदर्शनास आले आहे. काही ठिकाणी वीजजोडणी,बोअरवेल, तसेच शेतीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यात आल्याचा मुद्दाही समोर आला आहे. प्रशासनाच्या पाहणीत अतिक्रमण अथवा अनधिकृत वापर निश्चित झाल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू होऊ शकते. मात्र त्यापूर्वी प्रत्यक्ष जागेची मोजणी करून शासकीय जमीन निश्चित करणे आणि उपलब्ध पुराव्यांची नोंद करणे महत्त्वाचे ठरणार आहे. एमआयडीसीच्या या जमिनीवर भविष्यात औद्योगिक विकास उभा राहणार असल्याने शासकीय जमीन अतिक्रमणमुक्त करून ती सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी प्रशासनासमोर आहे. त्यामुळे चौकशीचा आदेश केवळ कागदावर न राहता प्रत्यक्ष कारवाईत कधी रूपांतरित होतो, याकडे आता श्रीगोंदा तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघाची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

**श्रीगोंदा :** आगामी निवडणूक प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघाची प्रारूप मतदार यादी दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. नागरिकांनी मतदार यादीतील आपले नाव, पत्ता, वय, लिंग तसेच इतर तपशील काळजीपूर्वक तपासून घ्यावेत. पात्र व्यक्तीचे नाव मतदार यादीत नसल्यास अथवा नोंदीमध्ये काही त्रुटी आढळल्यास विहित मुदतीत दावा किंवा हरकत नोंदविण्याचे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघातील एकूण मतदारांची संख्या ३ लाख ४८ हजार २२६ इतकी असून, प्रारूप मतदार यादीमध्ये ३ लाख ८ हजार ११६ मतदारांची नावे प्रसिद्ध करण्यात आली आहेत. मतदार यादीच्या पडताळणी प्रक्रियेदरम्यान मयत, स्थलांतरित व दुबार मतदारांची संख्या ४० हजार ११० इतकी असल्याची नोंद करण्यात आली आहे. तसेच मतदार यादीमध्ये विसंगती असलेल्या मतदारांची संख्या १९ हजार ५८३, तर मॅप न केलेल्या मतदारांची संख्या १२ हजार ६७९ इतकी असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे मतदार यादीच्या अचूकतेसाठी नागरिकांनी स्वतःच्या नावासह कुटुंबातील सर्व पात्र सदस्यांची नावे यादीत आहेत की नाहीत, याची खात्री करणे आवश्यक ठरणार आहे. पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत समाविष्ट नसल्यास फॉर्म क्रमांक ६ द्वारे नवीन नाव नोंदणीसाठी दावा दाखल करता येणार आहे. तर नाव, पत्ता अथवा इतर तपशीलांमध्ये दुरुस्ती आवश्यक असल्यास फॉर्म क्रमांक ८ द्वारे अर्ज करता येईल. नागरिकांना प्रारूप मतदार यादी मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्या अधिकृत संकेतस्थळावर, भारत निवडणूक आयोगाच्या मतदार सेवा पोर्टलवर तसेच संबंधित मतदान केंद्रावर अथवा बीएलओ (मतदान केंद्रस्तरीय अधिकारी) यांच्याकडे पाहता येणार आहे. मतदानाचा हक्क बजावायचा असेल, तर आधी मतदार यादीत नाव आहे का हे तपासणे आवश्यक आहे. त्यामुळे अंतिम यादीची वाट न पाहता नागरिकांनी आताच आपल्या नावाची खात्री करून आवश्यक दावे व हरकती वेळेत नोंदवाव्यात.

# श्री क्षेत्र वृध्देश्वरला हजारो भाविकांनी घेतले दर्शन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**तिसगाव :** श्री क्षेत्र वृध्देश्र्वर येथे तिसरा श्रावणीय सोमवार निमीत्त हजारो भावीकांनी स्वयंभु शिवपिंडीचे दर्शानासाठी गर्दी केली होती. बंब बंब भोले ,ऊँ नमो शिवायचा गजर करत वृध्देश्र्वर मंदीरात भावीकांचा उत्साह ओसंडुन वाहत होता.

यंदा पावसाने ओढ दिल्याने दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. ही दुष्काळी परिस्थिती कमी होऊन बळीराजावरील संकट दूर व्हावे आणि भरपूर पाऊस पडावा, यासाठी भाविकांनी श्री वृद्धेश्वराला पावसाचे साकडे घातले.



श्रावणी सोमवारनिमित्त विविध व्यक्ती सामाजिक संघटनांच्या वतीने भाविकांसाठी मोफत फराळ व अन्नदानाची व्यवस्था करण्यात आली होती. साबुदाणा, दुधाची खीर, केळी, खजूर, राजगिरा लाडू आदी उपवासाचे पदार्थही भाविकांना देण्यात आले. घाटशिरस येथील चालक, मालक व ग्रामस्थांच्या वतीने तब्बल ५०० लिटर दुधापासून मोफत चहाची सेवा देण्यात आली. तसेच भाविकांना पाच रुपये दराने एक लिटर पाण्याची बाटली उपलब्ध करून देण्यात आली. विविध खाद्यपदार्थांचेही वाटप करण्यात आले.यंदा मंदिर परिसरातील पार्किंगची व्यवस्था प्रशस्त करण्यात आल्याने वाहतूक कोंडीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटला. मंदिरात रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते.

श्री क्षेत्र वृध्देश्वर येथे तिसरा श्रावण सोमवार,व महाशिवरात्री निमीत्त यात्रा भरते नाथपंथाचे उगमस्थान म्हणुन येथे भावीकांची वर्षभर वर्दळ असते. श्रावण महिण्यात राज्याच्या विवीध भागातुन भावीक मोठ्या संख्येने येतात.

# कोरठणच्या कुस्ती आखाड्याची परंपरा कौतुकास्पद : लंके

## श्री क्षेत्र कोरठण खंडोबा देवस्थानचा कुस्ती आखाडा उत्साहात

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** कुस्ती ही महाराष्ट्राच्या मातीशी आणि संस्कृतीशी जोडलेली समृद्ध परंपरा आहे. श्री क्षेत्र कोरठण खंडोबा देवस्थानच्या वतीने दरवर्षी आयोजित होणारा हा कुस्ती आखाडा तरुणांमध्ये खेळाची आवड निर्माण करणारा आणि मल्लांच्या कलेला व्यासपीठ देणारा उपक्रम आहे. यंदाही मोठ्या संख्येने कुस्तीपटू सहभागी झाल्याचे पाहून आनंद झाला. कोरठणच्या कुस्ती आखाड्याची परंपरा कौतुकास्पद आहे. देवस्थान ट्रस्टने ही परंपरा अशीच पुढे सुरू ठेवावी. असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते दीपक लंके यांनी व्यक्त केले.

श्री क्षेत्र कोरठण खंडोबा देवस्थान, पिंपळगाव रोठा येथे श्रावण महिन्यानिमित्त आयोजित करण्यात आलेला पारंपरिक कुस्तीचा हगामा रविवारी (दि. ३० ऑगस्ट) उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. देवस्थान ट्रस्टच्या वतीने आयोजित या कुस्ती आखाड्यात महाराष्ट्रातील विविध भागांतून आलेल्या अनेक नामांकित कुस्तीपटूंनी सहभाग घेतला.

कुस्ती परंपरेचा भाग म्हणून यंदाही कुस्ती आखाड्याचे आयोजन करण्यात आले होते.



श्री क्षेत्र कोरठण खंडोबा देवस्थानचा कुस्ती आखाडा ही पंचक्रोशीच्या सांस्कृतिक आणि क्रीडा परंपरेची ओळख आहे. यंदाच्या आखाड्यात महाराष्ट्रातील विविध भागांतील कुस्तीपटूंनी मोठ्या संख्येने सहभाग घेतल्याने कार्यक्रमाला विशेष रंगत आली. **अशोक घुले**

आखाड्यात मल्लांनी आपले कौशल्य पणाला लावत उपस्थितांची मने जिंकली. अनेक कुस्त्या निकाली झाल्याने आखाड्यात चांगलीच रंगत निर्माण झाली होती.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते दीपक लंके यांनी आखाड्यास उपस्थित राहून कुस्त्यांचा आनंद घेतला. यावेळी तालुक्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, कुस्तीप्रेमी, ग्रामस्थ तसेच पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ढोकेश्वरच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळी ढोकेश्वर :** तिसरा श्रावणी सोमवारी ढोकी व टाकळी ढोकेश्वर येथील पुरातन पांडवकालीन लेणी म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री ढोकेश्वरच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती.पहाटे तीन वाजता ढोकेश्वर मंदिरातील पिंडीला दही दुग्ध असा महाजलाभिषेक करून पुजा करुन महाआरती करण्यात आली. डमरू व शंखनाद करत गोसावी कुटुंबाच्या वतीने विधिवत साज चढवत पहाटेपासूनच दर्शनासाठी ढोकेश्वर मंदिर खुले करून देण्यात आले.भाविकांनी ढोकेश्वर महाराजाचे दर्शन घेत हर हर महादेव,बम बम भोलेच्या घोषणांनी मंदिर परिसर दणाणून सोडला होता. या श्रावणमासात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.यात्रेमध्ये विविध खेळणी, पाळणाघरे,खाऊची दुकाने,संसारोपयोगी वस्ती खरेदी करण्यासाठी भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. यात्रेनिमित्त ढोकी ग्रामस्थांच्या वतीने जंगी हगामा भरविण्यात आला होता. कुस्त्यांच्या आखाड्याने यात्रेची सांगता झाली.

**क्विंटल साबुदाणा खिचडीचा महाप्रसाद**

श्री ढोकेश्वर यात्रेनिमित्त भाविकांसाठी टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांनी विशाल भंडाऱ्याच्या माध्यमातून २२ क्विंटल साबुदाणा खिचडी महाप्रसादाचे वाटपाचे आयोजन केले होते. श्रावणी सोमवार यात्रेनिमित्त ढोकेश्वरचे दर्शन झाल्यानंतर अनेक भाविकांनी ढोकेश्वर खिचडी महाप्रसादाचा लाभ घेतला.

# पारनेर शहरात शिवसेनेतर्फे रामरक्षा महाआरती

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** शिवसेना (उबाठा) पक्षाच्या वतीने पारनेर शहरात रामरक्षा महाआरतीचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. धार्मिक वातावरणात झालेल्या या महाआरतीस शिवसेनेचे पदाधिकारी, युवासेना, महिला आघाडी, शेतकरी सेना तसेच पारनेर तालुक्यातील शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी श्रीरामाच्या जयघोषाने परिसर भक्तिमय झाला.



महाआरतीच्या कार्यक्रमास शिवसेना जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी, डॉ. श्रीकांत पठारे, डॉ. भास्कर शिरोळे, दादाभाऊ येणारे, निलेश खोडदे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्रशांत निंबाळकर, सुनीता मुळे, अनिल शेटे, संतोष येवले, सखाराम उजगरे, संतोष साबळे यांच्यासह विविध पदाधिकारी सहभागी झाले.

या कार्यक्रमाला अविनाश पवार, सतीश मस्के, शुभम पाडळे यांच्यासह विविध सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांचीही उपस्थिती होती. किसन सुपेकर, किसन चौधरी, अशोक जिरेकर, राजूभाई शेख, शंकर नगरे आदी मान्यवरांनी उपस्थिती लावली.

यावेळी नितीन आहेर, आदिनाथ कदम, संभा थोरे, सहदेव तराळ, भीमाशेठ औटी, संदीप मोढवे, कैलासराव डोमे, बाळासाहेब मते, कुंडलिक कावरे, ठाकाराम बुगे, बाळासाहेब बुगे, बाळू बुगे, दत्तात्रय बुगे, राजू बोरुडे, संतोष भुसारे, मयूर कावरे, भरत श्रीमंदीलकर, तेजस औटी, संतोष भोर, यारकार दुधाडे, भरत औटी, बाबासाहेब रेपाळे, पप्पू शेठ गाडगे, सुरेश बुचुडे, लहू गाडगे, ज्येष्ठ नेते मनोहर परांडे, महेश गुंजाळ, राहुल मोरे, अक्षय सूर्यवंशी, नितीन औटी, निलेश दरेकर, अतुल मुळे, प्रदीप खोशे, अमोल जगताप, सुनीता मुळे, शरद जगदाळे, अशोक पंडित, साहेबराव खरात आदी शिवसैनिक व पदाधिकारी उपस्थित होते.

# एमएचटी-सीईटीमध्ये महा-घोटाळा?

## संभाजी ब्रिगेडकडुन गुन्हा दाखल करण्याची मागणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** महाराष्ट्राच्या लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणारा सर्वात मोठा शिक्षण घोटाळा समोर आला आहे. एमएचटी-सीईटी पीसीएम परीक्षेसाठी अर्ज केलेल्या हजारो विद्यार्थ्यांचा खाजगी डेटा चोरून खासगी सल्लागार संस्थांना विकल्याचा खळबळजनक आरोप करण्यात आला आहे. याच डेटाचा वापर करून पैसे घेऊन गुणताक्रम वाढवून दिला जात असल्याचा गंभीर आरोप संभाजी ब्रिगेड व प्राध्यापकांच्या वतीने केला आहे. पोलीस अधीक्षक व मुख्यमंत्र्यांकडे उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे. याप्रसंगी अण्णासाहेब सावंत, राजेश परकाळे, शाम जरे, प्रा. नारायण शिनगारे, प्रा. अजित खरसडे, प्रा. विवेक डोके, प्रा. सच्चिदानंद घोणसे, प्रा. सुषमा पोळ, प्रा. सुप्रिया गांधी, प्रा बाळासाहेब कीर्तने, सुदाम कोरडे, सचिन



काकडे, महेश दानवे, प्रशांत कांबळे, दादा ठोंबरे, भीमजी कोकाटे, राजेंद्र राऊत, सद्दाम सय्यद, बापू जगताप, दिलीप लबडे, दिलीप वाळुंज विद्यार्थी गायत्री शिरसाठ, श्रेयसी कदम, शर्वरी राऊत, प्रणव सावंत, जान्हवी भागवत, प्रियांका वरडुले, प्रणव कोटलवाड, सार्थक शिनगारे, उत्कर्ष पोटे, व शेकडो विद्यार्थी हजर होते.

# सेंसर बिघाडामुळे कॉंक्रिटीकरणाचे मशीन १७ दिवसांपासून बंद!

## पारनेर-सुपा रस्त्याचे काम ठप्प, वाहनचालक धुळीने हैराण

**दत्ता ऊनवणे । राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** देवभोयरे फाटा ते खडकी खंडाळा या रस्त्याचे काम सुरू असून हे काम सध्या पारनेर ते सुपा या अत्यंत वर्दळीच्या रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाचे काम सुरू असून सेंसर बिघाडामुळे कॉंक्रिटीकरणाचे मशीन १७ दिवसांपासून बंद आहे. कॉंक्रिटीकरणाचे मशीन गणपती फाटा परिमल मंगल कार्यालय, गायकवाड वस्तीजवळ सेंसर बंद पडल्याने जागेवरच बंद अवस्थेत उभे आहे.

खडकी ते देवीभोयरे फाटा या रस्त्याचे काम सुरू असून पारनेर शहरात २२ मीटर रस्ता झाला पाहिजे यासाठी नागरिकांनी पुढाकार घेतला यामुळे हा रस्ता चर्चेत आला आहे कामासाठी नागरिकांनी स्वतःहून पुढाकार घेतला मात्र ठेकेदाराच्या गलथानपणामुळे कामाला विलंब होण्याची शक्यता निर्माण झाली आहे याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे.

या रस्त्याचे काम राजपथ कन्स्ट्रक्शन या मोठ्या कंपनीकडे आहे. एवढी मोठी कंपनी असूनही केवळ एका सेंसरसाठी १७ दिवसांपासून मशीन बंद ठेवण्यात आल्याने कंपनीच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मशीन बंद असल्याने पारनेरपर्यंतच्या रस्त्याचे काम रखडले आहे. अर्धवट खोदलेला रस्ता, उडणारी प्रचंड धूळ आणि खडी यामुळे येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांना आणि परिसरातील नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. शाळकरी मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना धुळीमुळे त्रास होत आहे. वाहतूक कोंडी आणि अपघाताचा धोका वाढला आहे.



पारनेर-सुपा हा मुख्य रस्ता असून या मार्गावरून हजारो वाहनांची दररोज वर्दळ असते. राजपथ कन्स्ट्रक्शनने तातडीने सेंसर बसवून मशीन सुरू करावे आणि रखडलेले काम युद्धपातळीवर पूर्ण करावे. सार्वजनिक बांधकाम विभागाने याची दखल घेऊन कंपनीवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी पारनेरकर नागरिकांनी केली आहे.

# दखल



## धनकवडीतील कचऱ्याचा प्रश्न मार्गी; अडथळा ठरणारे खांब हटविले

**पुणे :** धनकवडी परिसरातील क्राऊन बेकरी ते एकता महिला मंडळादरम्यान मागील दीड महिन्यापासून निर्माण झालेला कचऱ्याचा प्रश्न तसेच रहदारीला अडथळा ठरणारे खांब अखेर हटविण्यात आले आहेत. युवा क्रांती पोलीस मित्र संघटनेच्या राष्ट्रीय महिला सहसंपर्कप्रमुख वर्षा नाईक यांनी वृत्तपत्रे व सोशल मीडियाच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधून सातत्याने पाठपुरावा केला होता.

धनकवडीतील पुण्याई नगर परिसरातील मुख्य रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात कचरा साचल्याने दुर्गंधी व अस्वच्छतेचे वातावरण निर्माण झाले होते. तसेच विविध ठिकाणी रस्त्यावर असलेले खांब रहदारीस अडथळा ठरत असल्याने वाहनचालक व पादचाऱ्यांची गैरसोय होत होती. या समस्यांची दखल घेत महापालिकेच्या संबंधित विभागाने कचरा हटवून रहदारीला अडथळा ठरणारे खांबही काढून टाकले. त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.या कार्यवाहीबद्दल महापालिका आरोग्य निरीक्षक श्रीधर कांबळे, मुकादम अनंता तावरे, जयश्री गायकवाड तसेच संबंधित कर्मचाऱ्यांचे वर्षा नाईक यांनी अभिनंदन केले. नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा केल्याबद्दल नाईक यांच्या प्रयत्नांचे नागरिकांकडून कौतुक होत असून, प्रशासनाने नागरिकांच्या तक्रारींची यापुढेही तातडीने दखल घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## गणेशोत्सवासाठी पुणे जिल्ह्यात २७ विशेष कार्यकारी दंडाधिकारी नियुक्त

**पुणे :** आगामी गणेशोत्सव शांततेत आणि सुरळीत पार पडावा तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पुणे जिल्हा प्रशासनाने २७ विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. अपर जिल्हादंडाधिकारी ज्योती कदम यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील कलम १४ अन्वये याबाबतचे आदेश जारी केले आहेत.यंदा पुणे जिल्ह्यातील सार्वजनिक गणेशोत्सवाला १४ सप्टेंबर २०२६ रोजी सुरुवात होणार असून २५ सप्टेंबर २०२६ रोजी अनंत चतुर्दशीला गणेशोत्सवाची सांगता होणार आहे. गणेश विसर्जनाच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर मिरवणुका निघतात तसेच विविध ठिकाणी नागरिकांची गर्दी होते. या काळात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, खेड, मावळ,मुळशी, शिरूर, पुरंदर, बारामती, दौंड, इंदापूर, भोर, वेल्हा आणि हवेली आदी तालुक्यांसह पुणे शहर परिसरातील विविध पोलीस ठाण्यांच्या कार्यक्षेत्रात हे अधिकारी कार्यकारी दंडाधिकारी म्हणून काम पाहणार आहेत.विसर्जन मिरवणुका रात्री उशिरापर्यंत सुरू राहण्याची शक्यता लक्षात घेऊन नियुक्त अधिकारी संबंधित पोलीस ठाण्यांच्या हद्दीत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करतील. नियुक्त अधिकाऱ्यांपैकी एखादे पद रिक्त असल्यास संबंधित तहसीलदार किंवा कार्यकारी दंडाधिकाऱ्यांना नजीकच्या नायब तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकाऱ्यांकडून अतिरिक्त कार्यभार देण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

## भुलेश्वरी येथे कावड, पालखी मिरवणूक उत्साहात



माळशिरस : पुरंदर तालुक्यातील माळशिरस येथील श्री क्षेत्र भुलेश्वरी येथे श्रावणातील तिसऱ्या सोमवारी हजारो भाविकांनी शिवलिंगाचे दर्शन घेतले. पहाटे पाच वाजता शिवलिंगास दही, दूध व पंचामृताने अभिषेक करण्यात आला. माळशिरस ग्रामस्थांच्या वतीने उपसरपंच छाया यादव व भाऊसो यादव यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली.यावेळी पुरंदर पंचायत समिती सदस्य माऊली यादव, माळशिरसचे माजी सरपंच अरुण यादव, नवनाथ यादव उपस्थित होते. पुणे जिल्हा बँकेचे अध्यक्ष दिगंबर दुर्गाडे यांनीही दर्शन घेतले.दुपारी बारा वाजता पाण्याच्या टाक्यात भुलेश्वरास अभिषेक करून महाआरती करण्यात आली. त्यानंतर कावड व पालखी मिरवणूक काढण्यात आली. दुपारी दोन वाजता मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ कावडींची धार घालण्यात आली.माळशिरस प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने आरोग्य सेवा, तर महावितरणच्या वतीने दोन वायरमनची व्यवस्था करण्यात आली होती. जेजुरी पोलिसांनी बंदोबस्त ठेवला. वन विभागाच्या कमानीबाहेर वाहने अडविल्याने वाहतूक कोंडी टळली. दिवसभर मंदिर परिसरात भाविकांची मोठी रांग लागली होती. भाविकांनी शिस्तीत दर्शन घेतले. यावेळी महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले.

## दक्षिण रायगडमध्ये गुणवंत शिक्षकांचा सन्मान

**दौंड :** महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षण संघटनेच्या वतीने आयोजित कोकण विभाग गुणवंत शिक्षक पुरस्कार सोहळा २०२६ (दक्षिण रायगड) उत्साहात पार पडला. कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्यात शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या संस्थाचालक, प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

रायगडचे पालकमंत्री भरत गोगावले आणि माजी राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी माणगाव एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष विजयराज खुळे, सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या ट्रस्टी गीताताई पालरेचा, शिक्षक परिषदेचे संपर्क प्रमुख विजय देवकर, दक्षिण रायगडचे संपर्क प्रमुख राजेंद्र पवार यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

शिवछत्रपती शिक्षक संघटनेचे दक्षिण रायगड अध्यक्ष राजकुमार मुंढे, उपाध्यक्ष शहाजी बेरे, सचिव आदेश सुतार, महिला आघाडी प्रमुख किरण काप तसेच तालुकाध्यक्ष व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री भरत गोगावले यांनी शिक्षकांच्या न्याय्य हक्कांसाठी सरकार सदैव त्यांच्या पाठीशी राहील, असे सांगितले. माजी राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील यांनी शिक्षकांच्या राष्ट्र उभारणीतील योगदानाचे कौतुक केले. आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले.

# पुणे जिल्ह्याची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत पुणे जिल्ह्यातील सर्व २१ विधानसभा मतदारसंघांची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पार पडली. यावेळी उप जिल्हा निवडणूक अधिकारी मिनल कळसकर, तहसीलदार शीतल मुळे तसेच राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी जिल्ह्यात ९० लाख ८० हजार १७३ मतदारांची नोंद होती. पुनरिक्षणानंतरच्या प्रारूप यादीत ६२ लाख १३ हजार ६९२ मतदारांची नोंद झाली आहे. त्यामध्ये ३१ लाख ५१ हजार २९७ पुरुष, ३० लाख ६२ हजार १२ महिला आणि ३८३ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे.

जिल्ह्यातील मतदान केंद्रांच्या संख्येत सातने वाढ झाली असून आता एकूण ८ हजार ४२४ मतदान केंद्रे आहेत. प्रारूप मतदार यादीत नाव नसल्यास प्रपत्र क्रमांक ६ भरून नव्याने नोंदणी करता येणार आहे. मतदार

| बाब | संख्या |
|---|---|
| विधानसभा मतदारसंघ | २१ |
| प्रारूप मतदार | ६२,१३,६९२ |
| पुरुष मतदार | ३१,५१,२९७ |
| महिला मतदार | ३०,६२,०१२ |
| तृतीयपंथी मतदार | ३८३ |
| मतदान केंद्रे | ८,४२४ |
| मतदान केंद्रांची वाढ | ७ |

**दावे-हरकतींचा कालावधी**
**३१ऑगस्ट ते ३० सप्टेंबर**
**अंतिम मतदार यादी ४ नोव्हेंबर २०२६**

यादीतील नावाबाबत आक्षेप असल्यास प्रपत्र क्रमांक ७, तर मतदार यादीतील दुरुस्ती व ई-पिक कार्डासाठी प्रपत्र क्रमांक ८ भरता येणार आहे.

प्रारूप यादीतील तपशिलात विसंगती आढळलेल्या तसेच २००२ च्या मतदार यादीशी मॅपिंग न झालेल्या मतदारांची संबंधित सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांच्या स्तरावर सुनावणी घेण्यात येणार आहे. सुनावणीनंतर संबंधित मतदाराचे नाव अंतिम यादीत समाविष्ट करण्याबाबत निर्णय घेतला जाईल.

प्रारूप मतदार यादीवर दावे व हरकती दाखल करण्यासाठी ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ हा कालावधी आहे. दावे-हरकतींवर ३१ ऑगस्ट ते २९ ऑक्टोबरदरम्यान कार्यवाही होणार असून, अंतिम मतदार यादी ४ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे.

जिल्ह्यातील सर्व २१ मतदारसंघांची प्रारूप यादी संबंधित मतदार नोंदणी अधिकाऱ्यांची कार्यालये, जिल्हाधिकारी कार्यालय आणि मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या जिल्हाध्यक्षांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळासह भारत निवडणूक आयोगाच्या एउखछएढ आणि तेंशिअ ड्शऑेंळलश झेऑेंरश्र वरही यादी पाहता येणार आहे.




पुणे जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदारसंघांची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करताना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, उप जिल्हा निवडणूक अधिकारी मिनल कळसकर, तहसीलदार शीतल मुळे व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी.

# एसडीजी उद्दिष्टांसाठी विभागांनी समन्वयाने काम करावे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** शाश्वत विकास उद्दिष्टे (एसडीजी) सन २०३० पर्यंत साध्य करण्यासाठी विकासकामांना गती देत विविध शासकीय विभागांनी अभिसरणातून समन्वयाने आणि परिणाम आधारित पद्धतीने काम करावे. उपलब्ध निधीचा प्रभावी व परिणामकारक वापर करावा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांनी दिले.



शाश्वत विकास उद्दिष्टांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. परदेशी बोलत होते. यावेळी सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, यशदाचे महासंचालक डॉ. सुहास दिवसे आणि उपमहासंचालक मल्लिनाथ कलशेट्टी उपस्थित होते.

महाराष्ट्राचा एसडीजी इंडेक्स स्कोअर ७३ टक्के असून आरोग्य, ऊर्जा आणि शाश्वत नागरी विकास क्षेत्रात राज्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. 'उत्तम आरोग्य व सुदृढता', 'परवडणारी व स्वच्छ ऊर्जा' तसेच 'शाश्वत शहरे व समुदाय' या उद्दिष्टांमध्ये राज्याची कामगिरी विशेष उल्लेखनीय असल्याचे डॉ. परदेशी यांनी सांगितले.

'शून्य भूक' या उद्दिष्टातील कामगिरी सुधारण्यासाठी कुपोषण आणि रक्तक्षय निर्मूलनाला प्राधान्य द्यावे. इतर राज्यांतील प्रभावी उपाययोजनांचा अभ्यास करून त्यांची अंमलबजावणी करावी, असे निर्देश त्यांनी दिले. आरोग्य विमा योजनांचा लाभ अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी पात्र लाभार्थ्यांची नोंदणी, कार्ड वितरण आणि अधिक रुग्णालयांचा योजनांमध्ये समावेश करण्यावर भर देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी रिअल टाइम माहिती संकलित करणारी सक्षम व्यवस्थापन माहिती प्रणाली विकसित करावी. योजनांमुळे नागरिकांच्या जीवनमानात झालेला प्रत्यक्ष बदल मोजून त्याआधारे पुढील नियोजन करावे. निधीचा परिणामकारक वापर आणि खर्चाचे नियमित मूल्यांकन करून त्याची एसडीजी निर्देशकांशी सांगड घालावी, असेही त्यांनी सांगितले.नियोजन विभागाने 'ॲस्पिरेशनल डिस्ट्रिक्ट' आणि 'ॲस्पिरेशनल ब्लॉक' उपक्रमाशी समन्वय साधून राज्यातील १० जिल्हे आणि १७७ तालुक्यांच्या कामगिरीवर विशेष लक्ष केंद्रित करावे. पुढील चार वर्षांत योजना, निधी, अंमलबजावणी आणि प्रत्यक्ष परिणाम यांची सांगड घालून विकासाचा वेग वाढवावा, असे आवाहन डॉ. परदेशी यांनी केले.

ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी विविध विभागांच्या योजनांमध्ये अभिसरण व समन्वयाची आवश्यकता अधोरेखित केली. केवळ योजना राबविण्याऐवजी त्यातून नागरिकांच्या जीवनमानात झालेली प्रत्यक्ष सुधारणा मोजणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यशाळेत राज्यातील एसडीजी प्रगती, विविध निर्देशांकांमधील महाराष्ट्राची स्थिती, विभागनिहाय कामगिरी आणि आगामी चार वर्षांतील उद्दिष्टांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

# 'हर हर महादेव'च्या गजरात सोमेश्वर दर्शनासाठी शिवभक्तांची गर्दी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोमेश्वरनगर :** बारामती तालुक्यातील करंजे येथील सोमेश्वर मंदिरात श्रावणातील तिसऱ्या सोमवारी हजारो शिवभक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली. सकाळपासूनच मंदिर परिसरात भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. 'हर हर महादेव', 'ॐ नमः शिवाय'च्या जयघोषाने परिसर भक्तिमय झाला होता.



भाविकांनी सोमेश्वराचे दर्शन घेऊन अभिषेक, पूजा तसेच बेलपत्र अर्पण केले. यावेळी पुणे जिल्हा आरोग्य बांधकाम माजी सभापती प्रमोद काकडे आणि वडगाव पंचायत समिती जितेंद्र पवार यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली. सोमेश्वर देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष अनंत मोकाशी, सचिव सचिन भांडवलकर यांच्यासह विश्वस्त मंडळ उपस्थित होते.

दुपारची खिचडी विजयकुमार सोरटे, प्रमोदकुमार व आदिती गीते, मनोहर जगताप आणि अभिमन्यू खोतकर यांनी दिली. तर आबाजी पाटील यांच्या स्मरणार्थ सचिन पवार व संजय गाढवे यांनी सायंकाळच्या महाप्रसादाचे आयोजन केले. बारामती लोकसभा खासदार सुप्रिया सुळे यांनीही सोमेश्वराचे दर्शन घेतले.

श्रावणातील तिसऱ्या सोमवारी मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते. परिसरात पाळणे, खेळणी, प्रसाद, पूजेचे साहित्य, हार-फुले व खाद्यपदार्थांची दुकाने थाटण्यात आली होती. लहान मुलांसाठीचे पाळणे व खेळण्यांची दुकाने आकर्षणाचे केंद्र ठरली. मंदिरावरील आकर्षक सजावट आणि विद्युत रोषणाईमुळे परिसराचे सौंदर्य खुलून दिसत होते.भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन सोमेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने आवश्यक सुविधा व नियोजन करण्यात आले. भाविकांसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच एसटी महामंडळ, महावितरण सोमेश्वरनगर, आरोग्य विभाग होळ आणि वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन यांच्या माध्यमातून आवश्यक सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. सुरक्षिततेसाठी मंदिर व परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे आणि पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

सोमेश्वर मंदिरात श्रावण महिन्यात विविध जिल्ह्यांतून भाविक दर्शनासाठी येत असल्याने तिसऱ्या सोमवारी मंदिर परिसर दिवसभर गजबजून गेला.

# चांडोली खुर्द येथे शॉर्टसर्किटने दोन एकर ऊस जळाला

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

निरगुडसर : चांडोली खुर्द येथे शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत शेतकरी ज्ञानेश्वर मार्तंड बांगर यांच्या सुमारे दोन एकर ऊसाचे पीक जळून खाक झाले. सोमवार सकाळी साडेअकराच्या सुमारास ही घटना घडली.



आग लागल्याचे समजताच परिसरातील शेतकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. ऊस पूर्ण वाढलेला असताना वाऱ्याचा वेगही अधिक असल्याने आग झपाट्याने पसरली. स्थानिक शेतकऱ्यांनी तब्बल तीन ते साडेतीन तास अथक प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. त्यामुळे आजूबाजूचा अंदाजे सहा ते सात एकर ऊस आगीपासून वाचला.

जळालेला ऊस १३ ते १४ महिन्यांचा असून तोडणीसाठी तयार झाला होता. त्यामुळे बांगर यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच महावितरणच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. सध्या कारखाना बंद असल्याने जळालेला तसेच शिल्लक ऊस केव्हा तोडला जाणार, याबाबत अनिश्चितता आहे. तोडणीला विलंब झाल्यास आणखी नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी तातडीने पंचनामा करून नुकसानभरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी माजी सरपंच राजेश ज्ञानेश्वर बांगर यांनी केली आहे.

# कार उलटून महिला ठार; तिघे जखमी

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

**तळेगाव ढमढेरे :** बीड येथे आजीच्या अंत्यविधीसाठी जात असताना शिवतक्रार म्हाळुंगी (ता. शिरूर) येथे कार उलटून झालेल्या अपघातात कोमल रोहन काळे (वय २६) यांचा मृत्यू झाला. या अपघातात अन्य तिघे जखमी झाले असून, घटनेमुळे काळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

इंदुरी (ता. मावळ) येथील रोहन काळे, कोमल काळे, किशोर काळे, प्रयागा काळे आणि आरोही काळे हे ज्ञानेश्वर कढणे यांच्या एमएच १४ एलएक्स १६८४ क्रमांकाच्या कारमधून बीड येथे अंत्यविधीसाठी जात होते. किशोर काळे कार चालवत होते. शिवतक्रार म्हाळुंगी परिसरात समोरून भरधाव वेगाने आलेल्या कारमुळे किशोर काळे यांनी आपली कार बाजूला घेतली. त्यावेळी कार रस्त्याच्या खाली शेतात उलटून अपघात झाला.

अपघातात कारमधील सर्वजण गंभीर जखमी झाले. नागरिकांनी तत्काळ जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. उपचारादरम्यान डॉक्टरांनी कोमल काळे यांना मृत घोषित केले.

याप्रकरणी रोहन आत्माराम काळे यांनी शिक्रापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार संदीप इथापे करीत आहेत.




शिवतक्रार म्हाळुंगी (ता. शिरुर) येथे रस्त्याचे कडेला उलटलेली कार. (छायाचित्र आकाश भोरडे)

**दिड वर्षाची चिमुकली बचावली.....**

शिवतक्रार म्हाळुंगी (ता. शिरुर) येथे कार उलटून झालेल्या अपघातात आरोही काळे हि दीड वर्षाची बालिका सुदैवाने बचावली असून तिला मात्र तिच्या आईच्या प्रेमाला कायमचे मुकावे लागले असल्याने नागरिकांनी हळहळ व्यक्त केली आहे.

# श्रावणी सोमवारनिमित्त भाविकांना फराळ वाटप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी धामणी :** आंबेगाव तालुक्यातील जारकरवाडी येथे श्री विठ्ठल-रुक्मिणी प्रतिष्ठानच्या वतीने श्रावणी सोमवार उत्सव २०२६ निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

पवित्र श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवारी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना फराळाचे वाटप करण्यात येत आहे.

जारकरवाडी येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या भूगर्भात पुरातन महादेव मंदिर असून, श्रावण महिन्यात भगवान महादेवाच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे. दर सोमवारी मंदिरात येणाऱ्या भाविकांसाठी खिचडी, केळी तसेच उपवासाचे लाडू आदी फराळाचे वाटप केले जात आहे.हिंदू धर्मामध्ये श्रावण महिन्याला विशेष धार्मिक महत्त्व आहे. या काळात भगवान



शंकराच्या दर्शनासाठी तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी भाविक मोठ्या संख्येने मंदिरांमध्ये येत असतात. या पार्श्वभूमीवर श्री विठ्ठल-रुक्मिणी प्रतिष्ठान व ग्रामस्थांच्या पुढाकारातून भाविकांसाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमासाठी प्रतिष्ठानचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत. मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या सर्व भाविक भक्तांनी फराळ वाटपाच्या या उपक्रमाचा लाभ घ्यावा तसेच श्रावणी सोमवार उत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन श्री विठ्ठल-रुक्मिणी प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.


**ग्रामपंचायत साळुंगण सांगवी, वे.खो. ता. भोर जि. पुणे**

**बी-१ निविदा सूचना - १/२०२६/२७**

प्रशासक ग्रामपंचायत साळुंगण सांगवी, वे.खो. ता. भोर जि. पुणे येथे खालील कामासाठी बी-१ पद्धतीने जि.प यांचे कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांच्याकडुन निविदा बी-१ दोन लिफाफा पद्धतीने सिलबंद लिफाफा मध्ये निविदा मागविण्यात येत आहे. दि ०१/०९/२०२६ सकाळी १०.०० ते ०८/०९/२०२६ सायं. ५.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात बंद लिफाफा मध्ये कार्यालयीन वेळेत सादर करण्यात याव्यात. सदर निविदा दि. ०९/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा ग्रामपंचायत कार्यालय मध्ये उघडण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम जीएसटी सह | अंदाजपत्रकीय रक्कम जीएसटी सोडून | इसारा रक्कम | कोरे निविदा रक्कम | कामाचा कालावधी | ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे साळुंगण येथील बुरूडमाळ येथे काँक्रीट रस्ता करणे | ९९९८७६/- | ८४४६०४ | ८४४७/- | २३६ | ३ महिने | सु.बे.अ. |

**निविदा अटी व शर्ती -** १) कोणत्याही निविदा स्वीकारण्याचा अथवा निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीकडे राखून ठेवला आहे २) कोऱ्या निविदा नमुन्याची फी (टेंडर फी) रक्कम ग्रामपंचायत साळुंगण सांगवी, वे.खो. या नांवाने चेक /कॅश ऑनलाईन भरून निविदा उपलब्ध होतील ३) निविदा मधील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे तांत्रिक लिफाफा मध्ये सादर करण्यात यावे ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत साळुंगण सांगवी, वे.खो. या नावाने चेक/कॅश ऑनलाईन / डीडी लिफाफा न १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय लिफाफा क्र. २ उघडला जाणार नाही.

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत साळुंगण सांगवी वे.खो.**

**सरपंच**
**ग्रामपंचायत साळुंगण सांगवी वे.खो.**

# आभाळ कोरडे; शिवार करपले; ५० हजार हेक्टर खरीप संकटात

## अडीच लाख पशुधनांचा जीव टांगणीला; तालुक्यातील विदारक चित्र

**शशिकांत पवार । राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** पावसाळ्याचे तीन महिने उलटून गेले तरी दमदार पावसाने पाठ फिरवल्याने नगर तालुक्यातील खरीप हंगाम संकटाच्या खाईत लोटला आहे. तालुक्यात सुमारे ५० हजार हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झाली आहे. सुरुवातीला तुरळक पावसावर झालेली पेरणी आणि त्यानंतर झालेल्या रिमझिम पावसाच्या आधारावर पिके कशीबशी तग धरून होती. मात्र ऐन फुलोऱ्यात आलेल्या सोयाबीनसह अन्य पिकांना पाण्याची नितांत गरज असताना पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर पिके करपण्याची वेळ आली आहे.

सोयाबीनला फुले लागली असतानाच पाण्याअभावी फुलगळ सुरू झाली असून उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. बाजरी, मका, तूर, मूग, कापूस, चारा पिकांचीही अवस्था समाधानकारक नाही. अनेक भागांत पिकांची पाने सुकू लागल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. पावसाची स्थिती अत्यंत चिंताजनक आहे. नद्या, नाले, ओढे अद्याप वाहिलेले नाहीत. तलाव व बंधाऱ्यांमध्ये नव्याने पाण्याची आवक झालेली नाही. भूजल पातळीतही वाढ झाली नसुन शेतकऱ्यांची परिस्थिती बिकट झाली आहे.



इमामपूर परिसरातील तलाव कोरडे ठाक..... खरीप पिकांची झालेली दयनीय अवस्था.... विहीरींनी तळ गाठला.....

ऐन पावसाळ्यातही १८ गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा सुरू असून परिस्थिती अशीच राहिल्यास टँकरवर अवलंबून असलेल्या गावांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे. खरीप हंगाम हातातून जाण्याची भीती असतानाच आगामी रब्बी हंगामाचेही मोठे संकट शेतकऱ्यांसमोर उभे ठाकले आहे.

पावसाअभावी केवळ शेतीच नव्हे तर पशुधनाचेही मोठे संकट निर्माण झाले आहे. तालुक्यात गाय व म्हैसवर्गीय १ लाख ४५ हजार ६३७, तर शेळी व मेंढीवर्गीय १ लाख ९ हजार १७८ पशुधन आहे. म्हणजेच सुमारे २ लाख ५५ हजार पशुधनाच्या चारा-पाण्याचा प्रश्न पशुपालकांसमोर उभा राहिला आहे.

शेतातील पिकांवर आणि उपलब्ध चाऱ्यावर अवलंबून असलेल्या पशुपालकांना आता जनावरे जगविण्यासाठी चाऱ्याची मोठी कसरत करावी लागणार आहे. पाऊस नाही, चारा नाही आणि पाण्याचीही टंचाई अशा संकटात पशुपालक सापडले आहेत. सध्याचे विदारक चित्र पाहता खरीप हंगामासह रब्बी हंगामावरही अनिश्चिततेचे सावट निर्माण झाले आहे. मात्र परतीचा पाऊस जोरदार बरसावा, कोरडे जलस्रोत भरून निघावेत आणि रब्बी हंगामात पुन्हा शिवार हिरवेगार व्हावे अशी आशा बळीराजा करत आहे. आभाळाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्यांना दमदार पावसाची प्रतीक्षा आहे.

> ऐन फुलोऱ्यात पावसाने दडी मारल्याने खरीप पिके संकटात आली आहेत. मोठा खर्च करून पेरणी केली. परंतु पावसाअभावी उत्पन्नाची शाश्वती राहिलेली नाही. शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडणार आहे.
>
> **निलेश कासार (शेतकरी, वाळकी)**

> इमामपूर येथे एप्रिल महिन्याच्या सुरुवातीपासून पिण्याच्या पाण्यासाठी टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. परंतु पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून पाऊस झाला नाही तर वाढीव टँकर घेण्याची वेळ येणार आहे. गावांमध्ये पाणी व चाऱ्याचा गंभीर प्रश्न बनलेला आहे. खरीप पिकांची तर खूपच दयनीय अवस्था झाली आहे.
>
> **बाजीराव आवारे (प्रशासक,इमामपूर)**

# जनावरांच्या छावण्या सुरू करण्याची मागणी : ठोंबरे

## विहिरी, तलाव कोरडे चारा पाणी टंचाईचे सावट

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** यंदा पावसाने पाठ फिरवल्याने अहिल्यानगर जिल्ह्यात अनेक भागात चारा पाणी टंचाईचे संकट दिवसेंदिवस गंभीर होत चालले आहे. अत्यल्प पावसामुळे विहिरी, तलाव, बोअरवेल व इतर जलस्रोतांमधील पाणीसाठा कमी झाल्याने शेतीसह पशुधनाच्या चारा पाण्याचा गंभीर प्रश्न शेतकर्यांसमोर उभा राहिला आहे. सोयाबीन, तूर यांसारखी पिके पावसाअभावी जळू लागल्याने शेतकर्यांचे मोठे आर्थिक नुकसान होऊ पाहत असल्याने शेतकरी चिंतातुर झाला आहे.



ही भयावह परिस्थिती पाहता शासनाने तातडीने अहिल्यानगर जिल्ह्यातील दुष्काळ ग्रस्त व पाणीटंचाई ग्रस्त गावांचा आढावा घेऊन गावोगावी जनावरांच्या छावण्या सुरू करण्याची मागणी शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते रघुनाथ ठोंबरे यांनी केली आहे.

सुरुवातीला झालेल्या अल्पशा पावसावर शेतकर्यांनी पेरण्या केल्या, मात्र त्यानंतर पावसाने दीर्घकाळ आजतागायत उघड दिल्याने आवश्यक ओलावा न मिळाल्याने परिणामी अनेक भागात पिकांनी माना टाकल्या आहेत. त्यामुळे शेतकर्यांपुढे आडात नाही तर पोहर्यात कुठून येईल? या पाणी टंचाई व चारा टंचाईमुळे पशुधन कसे वाचवावे? हा गंभीर प्रश्न शेतकर्यांसमोर उभा राहिला आहे. याचा शासनाने गांभीर्याने विचार करून जनावरांच्या छावण्या सुरू करण्याची मागणी रघुनाथ ठोंबरे, अमोल घिगे, दादासाहेब ठोंबरे, संतोष घिगे, बाळासाहेब ठोंबरे, प्रदीप खरात, मेसू उबाळे या शेतकर्यांनी केली आहे.

## द•ख•ल

### तुकाराम वरखडे यांचे धार्मिक योगदान मोठे : शालिनी विखे पा.



**निघोज :** निघोज आणी पंचक्रोशीतील गावात कै. तुकाराम वरखडे यांचे धार्मिक योगदान मोठे असून प्रतिक तसेच बाबाजी वरखडे यांनी तुकाराम यांच्या कार्याचे अनुकरण करीत सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक कामांच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने सेवाभाव केला असल्याचे प्रतिपादन शालिनीताई विखे पाटील यांनी व्यक्त केले आहे. वरखडे कुटुंबाचे सांत्वन करण्यासाठी विखे ताई आल्या होत्या. यावेळी पुष्पाताई वराळ पाटील, ज्ञानेश्वर माऊली वरखडे, जयश्रीताई उदावंत, बाबाजी महाराज वरखडे, ज्ञानदेव वरखडे, अक्षय वरखडे, वेदांत वरखडे, डॉ. सुजय विखे पाटील, प्रतिक वरखडे तसेच जय बजरंग मंडळाचे पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

### दरोडी विविध कार्यकारी सेवा सोसायटीची वार्षिक सभा संपन्न



**निघोज :** दरोडी विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटीची सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा सोसायटीचे चेअरमन रवींद्र कारभारी पावडे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच दरोडी येथे खेळीमेळीच्या व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. सभेच्या सुरुवातीस दरोडी गावचे माजी आदर्श सरपंच तथा सोसायटीचे कार्यशील सभासद कै. अनिल लक्ष्मण पावडे यांना उपस्थित संचालक मंडळ व सभासदांच्या वतीने पुष्पांजली अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. सभेला सोसायटीचे चेअरमन रवींद्र कारभारी पावडे, संग्राम पावडे , नामदेव भोसले, बाळासाहेब चौगुले, नितीन पावडे, कुंदन भोसले, राजेश पावडे, फकीरा गायकवाड, भानुदास भोसले तसेच सभासद गंगाधर भोसले, राजू पावडे, बाळू भोसले, लक्ष्मण भोसले, विठ्ठल पावडे, रावसाहेब पावडे, सुरेश पावडे, भानुदास पावडे, जयराम दळवी, अमोल दळवी यांच्यासह सभासद व नागरिक उपस्थित होते.

### उद्योग-व्यवसाय व गुंतवणूक परिषदेत राजेश देशपांडे यांचा सन्मान!

**नगर तालूका :** मुंबई येथे नुकत्याच (२५ ऑगस्ट) पार पडलेल्या उद्योग व्यवसाय व गुंतवणूक परिषदेत अहिल्यानगरच्या देशपांडे इन्वेस्टमेंटचे संचालक व अर्थतज्ञ श्री. राजेश देशपांडे यांचा फायनान्शिअल रिस्क मॅनेजमेंट गटात उत्तम कामगिरीबद्दल उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला. या परिषदेत कॅबिनेट मंत्री आशिष शेलार, कॅबिनेट मंत्री पंकजा मुंडे, कॅबिनेट मंत्री छगन भुजबळ, कॅबिनेट मंत्री संजय शिरसाठ तसेच हिरानंदानी उद्योग समूहाचे संस्थापक डॉ. निरंजन हिरानंदानी तसेच देशभरातील गुंतवणूक, कृत्रिम बुद्धिमत्ता, अपारंपारिक ऊर्जा, शिक्षण, रियालिटी क्षेत्रातील उद्योजक उपस्थित होते. श्री. राजेश देशपांडे मागील १७ वर्षांपासून गुंतवणूक तज्ञ म्हणून अहिल्यानगर येथे काम पाहत आहेत. भारतीय भांडवली बाजारात मोठ्या शहरांसोबतच आता मध्यम व लहान शहरातील गुंतवणूक वाढत आहेत. अशावेळी आर्थिक क्षेत्रात काम करणार्या संस्था व व्यावसायिक यांनी सामान्यांच्या गुंतवणुकीतील जोखीम व्यवस्थापन म्हणजेच रिस्क मॅनेजमेंटला महत्व देणे गरजेचे असल्याचे राजेश देशपांडे यांनी स्पष्ट केले. यासोबतच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वेगाने बदलणार्या काळात देशातील तरुणांमध्ये घेतलेल्या पदवीसहित प्रत्यक्ष कार्यकौशल्य वाढण्यासाठी उद्योगव्यवसायात असणार्या प्रत्येकाने कौशल्य वाढीसाठीच्या उपक्रमात सहभाग वाढविणे गरजेचे असल्याचे त्यांनी आग्रहाने नमूद केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्रातील विकास केवळ राज्यापुरता मर्यादित नसून संपूर्ण देशाचे एक प्रमुख विकास इंजिन होण्याच्या दिशेने महाराष्ट्र पावले टाकीत असल्याचे स्पष्ट केले. उपस्थित उद्योजक, नागरिक व संशोधन करणार्या संस्थांना त्यांनी आगामी चेंजमेकर्स म्हणून या विकासात सहभागी होण्याचे आवाहन केले. महाराष्ट्रातील विकास फक्त एका भागापुरता संकुचित न करता आता संपूर्ण विदर्भ, मराठवाडा, कोकण व पश्चिम महाराष्ट्रात औद्योगिक पार्क, लॉजिस्टिक हब, आयटी झोन, मेट्रो प्रकल्प यांचे निर्णय वेगाने घेत जात असल्याचे सांगितले.

# श्रावणी सोमवारच्या पायी दिंडीने राशीन दुमदुमले



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**राशीन :** श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवारनिमित्त गेल्या तब्बल २० वर्षांपासून सुरू असलेल्या बारा ज्योतिर्लिंग पायी दिंडी प्रदक्षिणा व अभिषेक सोहळ्याला यंदाही भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ह.भ.प. मोतीराम महाराज सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली सकाळी ९ वाजता श्री जगदंबा देवी मंदिरातून दिंडीचे प्रस्थान झाले. प्रस्थानापूर्वी नितीन शेटे स्वामी यांच्या हस्ते आरती करण्यात आली. त्यानंतर टाळ-मृदुंगाच्या गजरात दिंडीने बारा ज्योतिर्लिंग प्रदक्षिणेला सुरुवात केली. दिंडी सोहळ्यात महिला भगिनींची लक्षणीय उपस्थिती होती, तर पुरुष भाविकांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. नितीन शेटे स्वामी, ह.भ.प. मोतीराम महाराज सोनवणे, मिलिंद राऊत पत्रकार, किशोर जाधव व दीपक थोरात यांच्या पुढाकारातून दोन दशकांपूर्वी सुरू झालेली ही भक्तीची परंपरा आजही अखंडपणे सुरू आहे. मृदुंग वादक मनोज महाराज इसापुरे यांच्यासह टाळ-वीणा वादक सुभाष फराटे, अशोक काळे आणि मिलिंद रेणुके यांनी अभंग, टाळ-मृदुंग व नामस्मरणाने संपूर्ण परिसर भक्तिमय केला. दरम्यान, पप्पू शेठ टाक यांच्या वतीने दिंडीतील वारकरी व भाविकांना केळी वाटप करण्यात आले. बारा ज्योतिर्लिंगांची प्रदक्षिणा पूर्ण करून दिंडी पुन्हा श्री जगदंबा देवी मंदिरात दाखल झाली.

# विकास आराखडा मंजूर, पण निधी रखडला

## ग्रामस्थांची शासनाविरोधात नाराजी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**शिराळ चिचोंडी :** पाथर्डी तालुक्यातील धारवाडी येथे ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेली विशेष ग्रामसभा सरपंच तारामती भीमराज सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. या ग्रामसभेत विविध विकास योजनांअंतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीचा वार्षिक विकास आराखडा एकमताने मंजूर करण्यात आला. यामध्ये रस्ते, पाणी, वीज, घरकुल यासारख्या मूलभूत सुविधा आणि विविध कल्याणकारी कार्यक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. सभेचे विषयपत्रिका वाचन व मागील सभेच्या इतिवृत्ताचे वाचन ग्रामविकास अधिकारी विठ्ठल आव्हाड यांनी केले.

या ग्रामसभेला तरुण आणि शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. मात्र, ग्रामसभेला गैरहजर राहणाऱ्या पदाधिकारी व अधिकाऱ्यांबद्दल ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित असतानाही कृषी अधिकारी अनुपस्थित राहिले. तसेच काही ग्रामपंचायत सदस्यांनीही दांडी मारल्यामुळे ग्रामस्थांनी हळहळ व्यक्त केली. या अनुपस्थित अधिकाऱ्यांवर वरिष्ठांकडे तक्रार करून कारवाईची मागणी करण्याचा निर्णय ग्रामसभेने एकमुखाने घेतला.

गेल्या एक वर्षापासून शासनाकडून ग्रामपंचायतीला कोणताही निधी न मिळाल्याने गावातील अनेक महत्त्वाची विकास कामे प्रलंबित राहिल्याचे ग्रामविकास अधिकारी विठ्ठल आव्हाड यांनी स्पष्ट केले. यामुळे शासनाच्या कारभाराविरोधात ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली.

या विशेष ग्रामसभेस उपसरपंच रामेश्वर काळापहाड, भाऊसाहेब गोरे, मच्छिंद्र आव्हाड, आदिनाथ गीते, कृष्णा गोरे, शशिकांत रणसिंग, भाऊसाहेब सोनवणे, शब्बीर शेख, विलास सोनवणे, चंद्रकांत गवळी, अमोल गोरे, विक्रम गीते, नवनाथ काळापहाड यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> **निधीअभावी विकासकामे ठप्प : काळापहाड**
>
> शासनाकडून निधी न मिळाल्याने गावातील अनेक महत्त्वाची विकास कामे प्रलंबित राहिली आहेत, याची मोठी खंत वाटते. शासनाने वेळेत निधी उपलब्ध करून दिल्यास सर्व कामे तात्काळ मार्गी लागतील आणि गाव विकासात कुठेही मागे पडणार नाही. केवळ घरपट्टी आणि पाणीपट्टीच्या वसुलीवर गावाचा पूर्ण विकास होणे शक्य नाही.

# मुंगी येथे घरकुल कामांची मंजुषा ठवकरकडून पाहणी

## लाभार्थ्यांच्या अडचणी जाणून घेत तात्काळ सोडविण्याच्या सूचना

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** हातगाव - अहिल्यानगर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक मंजुषा ठवकर यांनी रविवार, दि.३०ऑगस्ट रोजी शेवगाव तालुक्यातील मुंगी येथे घरकुल योजनेअंतर्गत सुरू असलेल्या बांधकामांची पाहणी करून लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी घरकुल लाभार्थ्यांच्या सिस्टीममधील मस्टर संदर्भात येणाऱ्या विविध अडचणी जाणून घेण्यात आल्या. या अडचणी तात्काळ सोडविण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. तसेच घरकुलाचे बांधकाम निर्धारित मुदतीत पूर्ण करण्याबाबत लाभार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी उत्कृष्ट व दर्जे दार पद्धतीने घरकुलाचे बांधकाम पूर्ण करणाऱ्या लाभार्थ्यांचा प्रकल्प संचालक ठवकर यांच्या हस्ते सपत्नीक सन्मान करण्यात आला. शासनाच्या घरकुल योजनांचा लाभ घेऊन लाभार्थ्यांनी दर्जेदार व वेळेत बांधकाम पूर्ण करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. या पाहणी दौऱ्यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी सातपुतेसाहेब, गटविकास अधिकारी महेश दहिफळे, मनरेगा को-ऑर्डिनेटर घिगे, विस्तार अधिकारी सचिन भाकरे,आकाश गोसावी, गृहनिर्माण अभियंता अमृत इसरवाडे, माजी सरपंच राजेंद्र ढमढेरे, विजय कुंढारे,अरुण गायकवाड, हारून सय्यद यांच्यासह ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी आर. आर.राठोड त्यांचे सर्व कर्मचारी व पदाधिकारी व घरकुल लाभार्थ्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



# गोरेगावात संत सावता महाराज व संगमेश्वर मंदिर सभामंडपाचे भूमिपूजन संपन्न

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**निघोज :** श्री संत सावता महाराज सभामंडप व श्री संगमेश्वर मंदिर सभामंडप बांधकामाचा भूमिपूजन समारंभ पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे अ. काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते उत्साहात संपन्न झाला. यावेळी बोलताना आ. दाते यांनी गोरेगाव येथे यापूर्वी करण्यात आलेल्या विविध विकासकामांचा आढावा घेतानाच मतदारसंघातील गावागावांत सुरू असलेल्या विकासकामांचा उल्लेख केला. गोरेश्वर देवस्थानच्या प्रस्तावित सभामंडप बांधकामास आगामी काळात ५० लक्ष तर गोरेगाव - पारनेर रस्त्याच्या मजबुतीकरणासाठीही निधी उपलब्ध करून देणार असल्याचे सांगत विकास हा केवळ काही भागापुरता मर्यादित न ठेवता प्रत्येक गावाच्या गरजा आणि नागरिकांच्या मागण्यांनुसार कामे मार्गी लावण्याचा आपला प्रयत्न असल्याचेही आ. दाते म्हणाले.

यावेळी बाबासाहेब तांबे, वसंतराव चेडे, सुमन तांबे, राजाराम नरसाळे, मिराबाई नरसाळे, प्रितेश पानमंद, दादाभाऊ नरसाळे, गणेश तांबे, सुरेश चौरे, बाबासाहेब चौरे, साहेबराव तांबे, भाऊसाहेब तांबे, भाऊ नरसाळे, योगेश नरसाळे, रामदास चौरे, बाबासाहेब नांगरे, ऋषीकेश नरसाळे, अनिल नरसाळे, वामन चौरे, दत्तोपंत नरसाळे, नवनाथ नरसाळे, बाळासाहेब नरसाळे, चिमभाऊ नरसाळे, भाऊ तांबे, भानुदास नरसाळे, ज्ञानदेव तांबे, बाळु नरसाळे, संतोष नरसाळे, अर्जुन चौरे, उत्तम चौरे, दत्तु चौरे, दादाभाऊ चौरे, ठेकेदार साहेबराव नरसाळे, सबाजी शेरकर, वैभव नरसाळे उपस्थित होते.

# वानरांच्या ‘मर्कटलिलांनी’ जेऊरकर त्रस्त!

## दुकानांमध्ये घुसखोरी; फळविक्रेत्यांचे नुकसान! नागरिकांवर धावून जाण्याचे प्रकार वाढले

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** गेल्या काही महिन्यांपासून जेऊर पंचक्रोशीत वानरांचा मोठ्या प्रमाणात वावर वाढल्याने नागरिक अक्षरशः त्रस्त झाले आहेत.

मुख्य बाजारपेठेसह वाड्या-वस्त्यांमध्ये वानरांचे कळप फिरताना दिसत असून दुकानांमध्ये घुसून उचकापाचक करणे, फळविक्रेत्यांच्या फळांवर डल्ला मारणे, घरांमध्ये शिरून वस्तू अस्ताव्यस्त करणे, तसेच नागरिकांवर धावून जाण्याचे प्रकार नित्याचे झाले आहेत.

फळविक्रेत्यांना वानरांच्या या उपद्रवाचा मोठा फटका बसत आहे. दुकानासमोर ठेवलेली फळे पळविणे किंवा खाणे, दुकानात घुसून वस्तूंची नासधूस करणे यामुळे विक्रेत्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. अनेकदा वानरांना हुसकावण्याचा प्रयत्न केल्यास ते नागरिकांच्या अंगावर धावून येत असल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. लहान मुलांना गुरगुरणे, त्यांचा पाठलाग करणे, तसेच नागरिकांना मारण्याचा किंवा चावण्याचा प्रयत्न करण्याच्या घटनांमुळे पालकांमध्येही चिंता वाढली आहे.

मागील वर्षी एका वानराने जेऊरमध्ये अक्षरशः उच्छाद मांडला होता. नागरिकांच्या तक्रारीनंतर मोठ्या परिश्रमानंतर वन विभागाच्या पथकाला त्याला बंदिस्त करण्यात यश आले होते. आता पुन्हा वानरांची संख्या वाढल्याने त्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

दरम्यान, गुरुवार, दि. २७ रोजी मुख्य बाजारपेठेत वानरांच्या आपापसातील भांडणात एक वानर गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. यानंतर वन विभागाचे कर्मचारी तसेच वानराला सुरक्षितपणे पकडण्यासाठी रेस्क्यू टीम जेऊरमध्ये दाखल झाली. मात्र जखमी वानर सापडले नसल्याने पथकाला परतावे लागले.

वानरांचा वाढता वावर केवळ नागरिकांसाठी त्रासदायक ठरत नसून फळबागांचेही मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे वानरांचा बंदोबस्त करावा आणि नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.



दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले | RNI No. MAHMAR/2019/82605 | वर्ष ७ वे | पाने ८ | मुल्य रू. ४.०० | अंक ३१८ | मंगळवार १ सप्टेंबर २०२६
| पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 | www.rashtrasahyadri.com

विशेष संपादकीय...
करण नवले

## सी.ए. पास झालो, पण अशोक बँकेत नापास झालो...

### मुरकुटे साहेब, ही कबुली नव्हे; सभासद-ठेवीदारांच्या प्रश्नांची सुरुवात आहे!



अशोक सहकारी बँकेवर रिझर्व्ह बँकेने निर्बंध लादले आणि हजारो सभासद, ठेवीदार व खातेदारांच्या पायाखालची वाळू सरकली. आयुष्यभराची कमाई सुरक्षित राहील, या विश्वासाने बँकेत ठेवलेल्या पैशांवर निर्बंध आले. अशा वेळी बँकेचे संस्थापक, सहकारातील ज्येष्ठ नेते आणि चार दशकांहून अधिक काळ सहकार-राजकारणावर प्रभाव ठेवणारे भानुदास मुरकुटे पत्रकारांसमोर आले. त्यांनी एक वाक्य उच्चारले, मी सी.ए. पास झालो, मात्र अशोक बँकेत नापास झालो.

हे वाक्य सहज म्हणून विसरून चालणार नाही. कारण हे केवळ एका व्यक्तीचे आत्मपरीक्षण नाही; या एका वाक्यात अशोक बँकेच्या आजच्या संकटामागील व्यवस्थापन, देखरेख, निर्णयप्रक्रिया आणि जबाबदारी याबाबत असंख्य प्रश्न दडलेले आहेत. मुरकुटे साहेब, आपण नापास झाल्याचे सांगितले; पण कोणत्या परीक्षेत नापास झालात? कोणाच्या निर्णयांमुळे? कोणत्या व्यवस्थेच्या अपयशामुळे? आणि या अपयशाची किंमत आता कोण मोजणार? हा खरा प्रश्न आहे.

आज अशोक बँकेचा ठेवीदार आपल्या पैशासाठी चिंतेत आहे. सभासदांच्या मनात अस्वस्थता आहे. बँकेच्या भवितव्याबाबत संभ्रम आहे. अशा वेळी केवळ मी नापास झालो एवढे म्हणून जबाबदारी संपत नाही. उलट त्या कबुलीजबाबानंतर प्रश्न अधिक तीव्र होतात.मुरकुटे हे अशोक बँकेचे संस्थापक आहेत. १९९६ मध्ये त्यांनी ही संस्था उभी केली. सहकार क्षेत्रात एखादी संस्था उभी करणारा नेता त्या संस्थेच्या कारभाराशी भावनिक आणि नैतिकदृष्ट्या जोडलेला असतो. अशोक बँकेबाबत मुरकुटे यांनी मात्र स्वतः संचालक मंडळात थेट पद न घेता तुलनेने वेगळी भूमिका ठेवली. आज बँकेचे अध्यक्ष विधिज्ञ सुभाष चौधरी, उपाध्यक्ष भाऊसाहेब हळनोर आणि इतर संचालक मंडळ कार्यरत असल्याचे सांगितले जाते. मुरकुटे स्वतः संचालक नसल्याचा मुद्दा त्यांच्या समर्थकांकडून पुढे केला जाऊ शकतो. पण सभासदांचा प्रश्न साधा आहे, की संचालक मंडळात नसणे म्हणजे संस्थेच्या घडामोडींशी जबाबदारी संपणे का? जर बँक चांगली चालली असती तर तिच्या यशाचे श्रेय संस्थापक नेतृत्वाला दिले गेले नसते का? मग संकट आले की मी संचालक नाही असे सांगून संस्थापक नेतृत्वाची नैतिक जबाबदारी संपते का? हा प्रश्न मुरकुटे साहेबांनी स्वतःला आणि आपल्या समर्थकांनी जनतेला विचारला पाहिजे. आणखी गंभीर प्रश्न म्हणजे बँकेतील काही कर्मचारी किंवा अधिकारी दोषी असतील, तर त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याची व्यवस्था कुठे होती? संचालक मंडळ काय करीत होते? लेखापरीक्षण यंत्रणा काय करीत होती? बँकेच्या आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवणारे जबाबदार अधिकारी काय करीत होते? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ज्या संस्थेवर हजारो सामान्य माणसांनी विश्वास ठेवला, (पान २ वर..)

# २ कोटी मतदार यादीबाहेर!

## एसआयआरचा महाराष्ट्राला धक्का : राज्यात ७ कोटी ७१ लाख ६५ हजार मतदारांचा समावेश; गैरहजर, स्थलांतरित, मृत व दुबार नोंदणीच्या कारणाने नावे वगळली

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**मुंबई : भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार महाराष्ट्रात सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण-२०२६ (एसआयआर) प्रक्रियेत राज्याच्या मतदार यादीत मोठा बदल झाला आहे. महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने सोमवारी विशेष सखोल पुनरीक्षणाची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली असून तब्बल २ कोटी ६ लाख ८८ हजार ४८७ मतदारांची नावे या प्रारूप यादीत समाविष्ट झालेली नाहीत. त्यामुळे आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक मतदाराने आपले नाव मतदार यादीत आहे की नाही, हे तातडीने तपासण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

**मतदारांनो, या तारखा लक्षात ठेवा**

| | |
|---|---|
| दावे व हरकती : | ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ |
| अंतिम मतदार यादी : | ४ नोव्हेंबर २०२६ |
| वयाची अर्हता : | १ ऑक्टोबर २०२६ |
| नवमतदार : | १ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी १८ वर्षे पूर्ण करणारे नागरिक |







सखोल पुनरीक्षण सुरू होण्यापूर्वी महाराष्ट्रात ९ कोटी ७८ लाख ५४ हजार ४९ मतदार नोंदणीकृत होते. एसआयआरनंतर प्रसिद्ध झालेल्या प्रारूप यादीत मात्र ७ कोटी ७१ लाख ६५ हजार ५६२ मतदारांचा समावेश आहे. म्हणजेच एकूण नोंदणीकृत मतदारांच्या तुलनेत तब्बल २१.१४ टक्के मतदारांची नावे प्रारूप यादीत दिसत नाहीत.

या प्रारूप यादीतील ३ कोटी ९५ लाख ८९ हजार ९०५ पुरुष, ३ कोटी ७५ लाख ७२ हजार ५७० महिला आणि ३ हजार ८७ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे.विशेष सखोल पुनरीक्षणादरम्यान गणना प्रपत्र न मिळणे, मतदार संबंधित ठिकाणी उपलब्ध नसणे, स्थलांतर, मृत्यू किंवा दुबार नोंदणी यांसारख्या कारणांमुळे मोठ्या संख्येने नावे प्रारूप यादीत समाविष्ट झालेली नाहीत. त्यामुळे प्रारूप यादीत नाव नसलेल्या प्रत्येक मतदाराने घाबरून न जाता आपले नाव कोणत्या कारणामुळे समाविष्ट झालेले नाही, याची माहिती घेणे आणि आवश्यक असल्यास दावे-हरकती दाखल करणे महत्त्वाचे ठरणार आहे.

मतदारांना घरबसल्या आपले नाव तपासता येणार आहे. त्यासाठी मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्या संकेतस्थळावर जाऊन 'प्रारूप मतदार यादी एसआयआर-२०२६' हा पर्याय निवडावा. त्यानंतर राज्य, वर्ष २०२६, एसआयआर प्रारूप मतदार यादी, जिल्हा, विधानसभा मतदारसंघ आणि भाषा निवडून संबंधित यादीभाग निवडावा. कॅप्चा भरल्यानंतर संबंधित मतदार यादीची पीडीएफ डाउनलोड करून त्यामध्ये आपले नाव तपासता येईल.

याशिवाय 'एएसएसडी लिस्ट' (अनुपस्थित, स्थलांतरित, मृत आणि दुबार नोंदणी) एसआयआर-२०२६ या पर्यायातून मतदार ओळखपत्र क्रमांकाच्या आधारे आपले नाव वगळण्यात आले आहे का, हेही तपासता येणार आहे. मतदान केंद्रनिहाय वगळलेल्या मतदारांची यादीही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

प्रारूप मतदार यादी जाहीर झाल्यानंतर आता मतदारांना दावे आणि हरकती दाखल करण्यासाठी ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ असा कालावधी देण्यात आला आहे. या कालावधीत मतदारांनी आपले नाव प्रारूप यादीत नसल्यास आवश्यक कागदपत्रांसह दावा दाखल करणे गरजेचे आहे. त्यानंतर प्रक्रिया पूर्ण करून ४ नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.एसआयआरसोबत राज्यातील मतदान केंद्रांची पुनर्रचना आणि सुसूत्रीकरणही करण्यात आले आहे. राज्यात यापूर्वी १ लाख २५३ मतदान केंद्रे होती. त्यापैकी ४३१ केंद्रे कमी करण्यात आली असून ३९४ नवीन केंद्रे वाढवण्यात आली आहेत. त्यामुळे आता राज्यात १ लाख २१६ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत.

मतदारांच्या सोयीसाठी आणि सुरक्षेच्या दृष्टीने १ हजार ४०३ मतदान केंद्रांची ठिकाणे बदलण्यात आली आहेत. तात्पुरत्या किंवा असुरक्षित ठिकाणी असलेली केंद्रे पक्क्या आणि सुरक्षित इमारतींमध्ये हलवण्यात आली आहेत.

मतदार यादीतील नाव म्हणजे मतदानाचा मूलभूत अधिकार. त्यामुळे आपले नाव आहेच या गृहीतकावर न राहता प्रत्येक मतदाराने आजच प्रारूप यादी तपासावी. नाव नसल्यास ३० सप्टेंबरपूर्वी दावा दाखल करावा, असे आवाहन निवडणूक यंत्रणेकडून करण्यात आले आहे.

# कुकडी सहकारी कारखाना जिल्हा बँकेकडून जप्त!

## सरफेसी कायद्यातर्गत कारवाई : चल-अचल मालमत्तेचा सुपूर्तनामा, पंचनामा व सील करण्यासाठी अधिकाऱ्यांची फौज तैनात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) माजी आमदार राहुल जगताप यांच्या अधिपत्याखालील कर्मवीर कुंडलिकराव जगताप (कुकडी) सहकारी साखर कारखाना जिल्हा बँकेने कर्जाच्या थकबाकीपोटी सोमवारी (दि. ३१) जप्त केला. जिल्हा बँकेने कर्जाच्या थकबाकीपोटी जप्त केलेला हा दुसरा साखर कारखाना आहे. यापूर्वी राहुरी येथील डॉ. तनपुरे कारखान्यावर अशाच स्वरूपाची कारवाई करण्यात आलेली आहे. जिल्हा बँकेच्या प्रशासक तथा विभागीय सहनिबंधक संगीता डोंगरे यांनी जप्तीच्या या कारवाईची माहिती दिली. दरम्यान दोन वर्षांपासून हा कारखाना बंद स्थितीत आहे.

सरफेसी कायद्याचे कलम २००२ मधील लागू तरतुदीनुसार माजी आमदार जगताप यांच्या अधिपत्याखालील कारखान्याची संपूर्ण चल व अचल मालमत्ता जिल्हा बँकेच्या ताब्यात घेण्याची मोठी प्रशासकीय कारवाई केली. कारखान्याची मालमत्तेचा ताबा, सुपूर्तनामा, पंचनामा, सील करणे तसेच नोटीस व बोर्ड लावण्यापर्यंतची संपूर्ण कार्यवाही करण्यासाठी बँकेने अधिकारी व कर्मचाऱ्यांची स्वतंत्र यंत्रणा नियुक्त केली होती. ही कारवाई पोलीस बंदोबस्तात करण्यात आली. या प्रकाराने सहकार क्षेत्रात मोठी खळबळ



उडाली आहे.

कुकडी कारखान्यावर श्रीगोंदा तालुक्याचे माजी आमदार राहुल जगताप यांच्या अध्यक्षतेखालील संचालक मंडळ होते. यापूर्वी ते राष्ट्रवादीच्या शरद पवार गटात होते. त्यांनी पूर्वी राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाकडे (एनसीडीसी) कारखान्यासाठी पॅकेजची मागणी केली होती. त्यावेळी त्यांचा प्रस्ताव महायुती सरकारकडून नामंजूर झाला होता. त्यानंतर त्यांनी अजित पवार गटात प्रवेश केला. ज्या बँकेने जगताप यांच्या अधिपत्याखाली कारखाना जप्त केला, त्या बँकेचे जगताप हे माजी संचालक आहेत.

कुकडी कारखाना गेल्या दोन वर्षांपासून बंद अवस्थेत आहे. यंदाच्या हंगामातही तो सद्य परिस्थितीमुळे सुरू होणारा नाही. कारखान्याने जिल्हा बँकेकडून सुमारे ३५० कोटी रुपयांचे **(पान ४ वर)**

**सरफेशी कायदा काय आहे ?**

हा कायदा २१ जून २००२ रोजी अस्तित्वात आला आणि देशातील सर्व बँका व सहकारी बँकांना लागू होतो. हा कायदा केवळ गहाण किंवा सुरक्षित तारण असलेल्या कर्जाच्या बाबतीत लागू होतो. हा भारतीय बँका आणि वित्तीय संस्थांना थकीत कर्ज (एनपीए) वसूल करण्यासाठी विशेष अधिकार देणारा एक अत्यंत महत्त्वाचा कायदा आहे. या कायद्याचे पूर्ण नाव Securitisation and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act असे आहे. या कायद्याचा मुख्य उद्देश बँकांना न्यायालयाच्या हस्तक्षेपाला शिवाय कर्जदाराने तारण ठेवलेली मालमत्ता जप्त करून तिची विक्री किंवा लिलाव करण्याचा अधिकार देणे हा आहे, जेणेकरून बँकांचे थकीत पैसे वेळेत वसूल होऊ शकतील.

**तालुका विकास अधिकारी अनुत्तरीत**

याबाबत जिल्हा को-ऑपरेटिव्ह बँकेचे तालुका विकास अधिकारी श्री. गायकवाड यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला होता त्यांनी फोन घेणे टाळल्याने त्यांच्याकडून अधिक माहिती मिळू शकली नाही.

# भोजापूर पूरचारीचा दमणगंगा - वैतरणा - गोदावरी नदीजोड प्रकल्पात समावेश

## महायुतीची मंजुरी; ३५ पाझर तलाव भरणार, ६०६ हेक्टर क्षेत्राला दिलासा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर :** संगमनेर तालुक्यातील भोजापूर प्रकल्पाच्या पूरचारीचा समावेश दमणगंगा-वैतरणा-गोदावरी नदीजोड प्रकल्पात करण्याच्या प्रस्तावाला महायुती सरकारने मान्यता दिली आहे. त्यामुळे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

भोजापूर पूरचारीद्वारे तालुक्यातील अवर्षणप्रवण भागातील जलसाठे भरून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे परिसरातील ३५ पाझर तलाव भरले जाणार असून, लाभक्षेत्रातील ६०६.६३ हेक्टर क्षेत्राला मोठा दिलासा मिळणार आहे. पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या भागासाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

तालुक्यातील भोजापूर मध्यम प्रकल्प हा संगमनेर आणि सिन्नर तालुक्यातील दुष्काळी भागासाठी वरदान ठरणारा प्रकल्प आहे. या प्रकल्पावर अवलंबून असलेल्या २७ गावांचा पाणीप्रश्न सोडविण्यासाठी या प्रकल्पाचा समावेश दमणगंगा-वैतरणा-गोदावरी नदीजोड प्रकल्पात करण्याबाबत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी निर्णय घेतला होता. याबाबत गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाकडे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाला मान्यता मिळाली असून, विभागाने घेतलेल्या निर्णयामुळे भोजापूर पूरचारीसाठी ४ द.ल.घ.मी. पाणी प्रस्तावित करण्यात आले आहे. या माध्यमातून ६०६.६३ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचा जलसंपदा विभागाचा प्रयत्न आहे.

प्रस्तावाला मिळालेल्या मान्यतेमुळे भोजापूर लाभक्षेत्रातील गावांमधील अंदाजे ३५ पाझर तलाव आणि जलसाठे भरून दिले जातील. प्रामुख्याने चिंचोली गुरव, पिंपळे, सोनेवाडी, नान्नजदुमाला, सोनोशी, पोखरी हवेली, तळेगाव, करुले, तिगाव आदी गावांमधील पाझर तलावांचा यामध्ये समावेश आहे. पूरचारीद्वारे पाणी देण्याच्या झालेल्या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे दुष्काळी गावांना मोठा दिलासा मिळणार आहे.

यापूर्वी जलसंपदा विभागाच्या माध्यमातून भोजापूर चारीच्या कामासाठी मंत्री विखे पाटील यांनी निधीची उपलब्धता करून दिल्यामुळे चारीचे काम पूर्ण करण्यात आले होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी गोदावरीच्या तुटीच्या खोऱ्यात वळविण्याचे प्रयत्न प्रशासकीय स्तरावर वेगाने सुरू झाले आहेत. भोजापूर प्रकल्पाचा समावेश दमणगंगा-वैतरणा-गोदावरी नदीजोड प्रकल्पात करून सिन्नर आणि संगमनेर तालुक्यातील दुष्काळी गावांना दिलासा देण्याची ग्वाही जलसंपदा मंत्री विखे पाटील यांनी दिली होती.

# पाथर्डीचा फरार दरोडेखोर नगरमध्ये जेरबंद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** खंडणी मागून चाकू व गावठी कट्ट्याचा धाक दाखवत सोन्याची चैन जबरीने लुटल्याप्रकरणी फरार असलेला मुख्य आरोपी सुधीर संभाजी शिरसाट (रा. आसरा नगर, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर ) याला स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने मोठ्या सीताफिने नगर शहरात पकडले.

दि. १२ ऑगस्ट रोजी फिर्यादी राहुल रामराव गरजे (रा. फुलेनगर, पाथर्डी ) हे घरी जात असताना आरोपी सुधीर शिरसाठ व त्याच्यासाठीदारांनी त्याची गाडी अडवली. आरोपींनी फिर्यादीकडे अडीच लाख रुपयांची खंडणी मागितली तसेच फिर्यादीच्या गळ्याला चाकू लावून व गावठी कट्ट्याचा धाक दाखवत त्याच्या गळ्यातील सोन्याची चैन जबरीने काढून घेतली. या घटने प्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर आरोपी फरार झाले होते. आरोपींच्या तपासासाठी पोलीस अधीक्षक मुमका सुदर्शन यांच्या आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस उपनिरीक्षक संदीप दरवडे, पोलीस अंमलदार विष्णू भागवत, सोमनाथ झांबरे, अशोक लीपने, फुरकान शेख, अशोक शिरसाठ, आदनाथ पाखरे यांचे पथक नियुक्त केले. दरम्यान २९ ऑगस्ट रोजी मुख्य आरोपी सुधीर शिरसाठ हा अहिल्यानगर येथील हॉटेल संगम येथे आल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी शिरसाट याला ताब्यात घेतले. त्याला पुढील तपासासाठी पाथर्डी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# 'एमओएच' रँकिंगमध्ये अहिल्यानगर महापालिका राज्यात द्वितीय

## सार्वजनिक आरोग्य सेवेत उत्कृष्ट कामगिरी : २९ महानगरपालिकांमधून मिळवले यश

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर महापालिकेने सार्वजनिक आरोग्य सेवेत उत्कृष्ट कामगिरी करत राज्याच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी (एम.ओ.एच.) रँकिंग मध्ये राज्यात दुसरा क्रमांक पटकावला आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या राज्य कार्यालयाकडून जून २०२६ च्या पहिल्या तिमाहीसाठी जाहीर झालेल्या या क्रमवारीत राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये अहिल्यानगर महानगरपालिकेने हे यश मिळवले आहे. या गौरवास्पद कामगिरीबद्दल राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे राज्य आयुक्त संजय काटकर यांच्या हस्ते अहिल्यानगर महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर यांचा सत्कार करण्यात आला.





राज्याच्या आरोग्य विभागाकडून विविध आरोग्य सेवा उपक्रम आणि पोर्टल वरील मासिक नोंदीच्या आधारे दर महिन्याला महानगरपालिकांचे आरोग्य अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी व सिव्हिल सर्जन यांचे स्वतंत्र रँकिंग केले जाते.

यामध्ये माता व बाल आरोग्य, गरोदर मातांची नोंदणी, लसीकरण, नवजात बालकांची काळजी, कुटुंब नियोजन व नसबंदी सेवांचा सविस्तर आढावा घेतला जातो. तसेच असंसर्गजन्य आजारांची नोंदणी व उपचार, क्षयरोग मुक्तीसाठी राबवले जाणारे अभियान, कीटकजन्य आजारांचे सर्वेक्षण, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व आपला दवाखाना येथील ओपीडी सेवा आणि आरोग्यवर्धिनी समितीच्या बैठका व त्याचे अनुपालन या सर्व निकषांवर प्रभावी काम काज केल्यामुळे अहिल्या नगरला हे मानांकन प्राप्त झाले आहे.

महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले की, शहरात आरोग्यविषयक सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सातत्याने सूचना देऊन नवनवीन उपक्रम हाती घेतले जात आहेत. शासनाच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या आरोग्यवर्धिनी केंद्रामधून नागरिकांना उत्तम दर्जाची आरोग्यसेवा उपलब्ध केली जात आहे.

येत्या काळात राज्यात पहिल्या क्रमांकाचे स्थान मिळवण्याच्या दृष्टीने महानगरपालिका अधिक चांगल्या उपायोजना राबवणार असल्याचे डांगे यांनी स्पष्ट केले. अहिल्यानगर महानगरपालिकेला मिळालेल्या या यशामुळे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.